जॉयस
मेयर

# येशू

## सर्व नावांपेक्षा श्रेष्ठ नाव

त्याच्या अभिषेकाची तुमच्या जीवनात मुक्तता

# येशू–सर्व नावांपेक्षा श्रेष्ठ नाव

*त्याच्या अभिषेकाची*
*तुमच्या जीवनात मुक्तता*

# येशू–सर्व नावांपेक्षा श्रेष्ठ नाव

*त्याच्या अभिषेकाची*
*तुमच्या जीवनात मुक्तता*

जॉयस मेयर

JOYCE MEYER
MINISTRIES ®

Plot No. 512/B, Road No. 30, Jubilee Hills, Hyderabad - 500 033

All Scripture quotations, unless otherwise indicated, are taken from *The Amplified Bible* (AMP). *The Amplified Bible, Old Testament.* Copyright 1965, 1987 by the Zondervan Corporation. *The Amplified New Testament,* copyright © 1954, 1958, 1987 by The Lockman Foundation. Used by permission.

Verses marked "TLB" are taken from *The Living Bible* © 1971. Used by permission of Tyndale House Publishers, Inc., Wheaton, Illinois 60189. All rights reserved.

Some Scripture quotations are taken from the *New American Standard Bible®,* (NASB®). Copyright © The Lockman Foundation 1960, 1962, 1963, 1968, 1971, 1972, 1973, 1975, 1977, 1995. Used by permission.

Scripture quotations marked "KJV" are taken from the *King James Bible* of the Bible.

Scripture quotations are italicized. Words emphasized by the author in Scripture quotations appear in italicized bold type. This emphasis does not appear in the original source of the Scripture quotations.

Copyright © 2015 by Joyce Meyer Ministries - Asia

All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed, or transmitted in any form or by any means, or stored in a database or retrieval system, without the prior written permission of Joyce Meyer Ministries - Asia.

Joyce Meyer Ministries - Asia
Plot No. 512/B, Road No. 30,
Jubilee Hills, Hyderabad - 500 033

Phone: +91-40-2300 6777
Website: www.jmmindia.org

Jesus–Name Above All Names - Marathi *(R1 - 2015)*
*Releasing His Anointing in Your Life*

*Printed at:*
Caxton Offset Pvt. Ltd.
Hyderabad - 500 004

# अनुक्रमणिका


प्रस्तावना 7

1. नावामध्ये सामर्थ्य आहे! 11

2. नाव आणि विश्वास! 21

3. नावाचा उपयोग 33

4. व्यर्थ नाव घेणे 45

5. नावाचा आदर व सन्मान 53

6. नाव आणि नाते 61

सारांश 69

देवाशी वैयक्तिक नाते जोडण्याकरिता प्रार्थना 71

संदर्भ 73

तारणाची प्रार्थना 77

# प्रस्तावना

व्यक्तींच्या नावांमध्ये काय आहे? जे आम्ही समजतो त्यापेक्षा पुष्कळ काही व्यक्तीच्या नावांत आहे. नाव व्यक्तीचे प्रतिनिधीत्व करते; व्यक्तीच्या स्वभावाचा नमुना ते दाखवते; तसेच व्यक्तीची ओळख करुन देऊन इतर सर्वांपेक्षा त्याला वेगळे करते. जेव्हा आपण एखाद्याला त्याच्या नावाने संबोधतो तेव्हा आपण केवळ नावच उच्चारत नाही तर त्या व्यक्तीबद्दल काहीतरी घोषणा ही करतो त्याचप्रमाणे जेव्हा आम्ही येशूचे नाव घेतो तेंव्हा केवळ नावच घेतो असे नाही. आम्ही त्या नावाची घोषणा करतो की ह्या नावात सामर्थ्य आहे मनुष्याचे सामर्थ्य नव्हे तर देवाचे. सर्व सामर्थ्य व सत्ता त्यामध्ये आहे. (कलैस्स 2:9,10)

जेंव्हा आम्ही नाव घेतो तेंव्हा आम्ही त्या व्यक्तीचे वर्णन करतो. येशू म्हणजे तारणारा, आणि जे येशू आम्हांसाठी करतो त्याचप्रमाणे आम्ही त्याचे नाव घेतो–तो आम्हाला आमचे पाप, अपयश, चुका व देवाच्या इच्छेविरुद्ध असणाऱ्या परिस्थितीपासून वाचवतो. “तिला पुत्र होईल, आणि त्याचें नाव तूं येशू असे ठेव, कारण तोच आपल्या प्रजेला त्याच्या पापापासून तारील.” (मत्तय 1:21)

पवित्रशास्त्र आम्हांस शिकवते की येशूच्या नावापेक्षा कोणतेही नाव श्रेष्ठ नाही. ते आम्हास हे ही शिकविते की येशूच्या नावाचा

उल्लेख करताच प्रत्येक मनुष्य व प्राणी यांचा गुडघा टेकलाच पाहिजे; कारण येशूच्या नावामध्ये स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली सामर्थ्य व सत्ता आहे. "ह्यामुळें देवानें त्याला अत्युच्च केलें, आणि सर्व नावापेक्षा जे श्रेष्ठ नांव ते त्याला दिलें; ह्यांत हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा." (फिलिप्पै 2:9,10)

येशूचे नाव येशूचे प्रतिनिधीत्व करते, म्हणून जेंव्हा आपण त्याच्या नावाने प्रार्थना करतो तेंव्हा जसे काय येशूच प्रार्थना करतो व मागतो.

जेंव्हा प्रार्थनेत आपण येशूचे नाव घेतो. तेंव्हा लगेचच सामर्थ्य आम्हांस दिले जाते.

कोणत्या प्रकारचे सामर्थ्य?

इतरांना आशीर्वाद देण्याचे सामर्थ्य; की जे सामर्थ्य आम्हांस मदत देते व देवाने ह्या उत्कृष्ट गोष्टीची योजना आमच्या जीवनासाठी केली आहे त्याचा आनंद घेण्यास साह्य करते.

पुष्कळ वेळेस सभांद्वारे मी सेवा करते तेंव्हा व्यासपीठावरुन मी येशूचे नाव घेते. जेंव्हा मी हे करते तेंव्हा त्याविषयी त्याची उपस्थिती व सामर्थ्य मुक्त झाल्याचे मला जाणवते. लोकांना आरोग्य मिळते यावर माझा विश्वास आहे, तसेच येशू त्यांचा तारणारा आहे असा जेंव्हा ते स्वीकार करतात तेंव्हा त्याच्या नावाने पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने त्यांचे अंतःकरणही सामर्थ्याने भरुन जाते.

येशूच्या नावातील सामर्थ्याविषयी आम्हांस आणखी प्रकटीकरण होण्याची गरज आहे.

काही वर्षापूर्वी मी *शब्द, नाव, रक्त या नावाचे पुस्तक* लिहिले व जेंव्हा, मी येशूच्या नावासंबंधी शिकविण्याची पुर्वतयारी करीत होते, तेंव्हा मी पुस्तकातील येशूच्या नावासंबंधीचा विक्रम पुन्हा वाचला. मी विश्वासाने सांगते की प्रभू माझ्या या विभागातील विश्वासाला बळकटी देत होता. मी हे ओळखते की वेळोवेळी देव मला सामर्थ्य व सत्ता यांविषयी ताजेतवाने धडे (अनुभव) देत होता.

येशूच्या नावात कीती सामर्थ्य आहे हे जरी पुर्ण आम्हांस माहित नसेल तरी त्यासंबंधी नवीन गोष्टी आम्ही शिकू शकतो, अथवा ह्या गोष्टी आम्हांस माहिती आहेत त्यांना पुन्हा गती देण्याची येथे गरज आहे. देवाच्या वचनांचे मुलभूत तत्वे आम्ही विसरावेत ही देवाची इच्छा नाही. त्याला माहिती आहे की जर आमच्या विश्वासाला या भागात जागृती दिली नाही तर जे काही आम्ही आमच्या जीवनात करतो, त्यात कार्यसिद्धि मिळणार नाही.

ख्रिस्ती या नात्याने जर तुम्हांस असे वाटत असेल का पूर्वी जशा गोष्टी घडत असत तसे आता घडत नाही; तेंव्हा कदाचीत आपणांस येशूच्या बाबतीत सामर्थ्याबाबत, देवाच्या वचनातील मुलभूत तत्त्वांचा विसर पडला असावा.

कधी आम्ही विचार करतो की इतर मोठ्या महत्वाच्या गोष्टींकडे आम्ही लक्ष लावून वेळ दिला पाहिजे, परंतु येशूच्या नावाचा अभ्यास करणे महत्वाचे नाही असे आम्हांस कदापी वाटता कामा नये.

जर देवाशी आमचे वैयक्तिक संबंध नसतील, तर आताचा काही गोष्टींचा उलगडा होणे आवश्यक आहे. जीवनात ज्या गोष्टीशी तुम्ही लढत आहात. त्या परिस्थितीला बदलवीण्याचे सामर्थ्य येशूच्या

नावात आहे. तेंव्हा एकच गोष्ट करावयाची गरज आहे ती म्हणजे येशूच्या नावात जे सामर्थ्य आम्हांकरिता मुक्त केले आहे ते घ्यावयाचे आहे.

त्याच्या सामर्थ्याने तुमच्या विरुद्ध येणाऱ्या गोष्टींना तुम्ही सहज हाताळू शकता.

येशूच्या नावातील सामर्थ्याविषयी जे काही मी शिकले ते तुमच्या विचारांना प्रकाश व गती देण्याकरिता मी येथे लिहित आहे.

या पुस्तकामध्ये प्रभावीपणे प्रार्थनेत येशूच्या नावाचे सामर्थ्य व सत्ता विश्वासाने कसे वापरावे हे शिकावयास मिळते.

देवाच्या वचनाची सेवीका म्हणून या विभागात माझा विश्वास बळकट असणे गरजेचे आहे, कारण त्याशिवाय मी वचनाची सेवा करु शकत नाही. जेंव्हा येशूचे नाव मी घेते तेंव्हा त्याचे महासामर्थ्य प्रत्येकवेळी आम्हांमध्ये कार्य करते याची जाणीव मी सातत्याने ठेवली पाहिजे.

मी प्रार्थना करते की जेंव्हा हे पुस्तक आपण संपूर्ण वाचाल तेंव्हा तुमचा प्रभू येशूच्या नावावरील विश्वास बळकट होऊन तुम्ही नाविन्याने प्रार्थना कराल, जेंव्हा तुम्ही हे आश्र्चयकारक नाव घ्याल तेंव्हा पुढे जाऊन जे करावयाचे आहे ते कराल. व तुमच्या व इतरांच्या जीवनात ज्या घडामोडींची आपण वाट पाहात आहात त्याचा अनुभव ही घ्याल!

येशूच्या नावाचे सामर्थ्य त्याच्या वचनांद्वारे आपण घेत असता देव तुम्हांस आशीर्वाद देवो–**सर्व नावांपेक्षा श्रेष्ठ नाव.**

# 1

# नावामध्ये सामर्थ्य आहे!

*आणि जे आपण विश्वास ठेवणारे त्या आपणांविषयीच्या त्याच्या सामर्थ्याचें अपार महत्व तें काय हे तुम्हीं त्याच्या बलशाली पराक्रमाच्या कृतीवरुन ओळखून घ्यावे.*

*इफिस 1:19*

कल्पना करा की आमच्या परिस्थितीवर मात करणारे भरपूर सामर्थ्य आम्हांस मिळाले–असे मोठे सामर्थ्य की त्याची शक्ती, बल मोजता येणार नाही. वरील परिच्छेदात संत पौल आम्हांस तंतोतंत हेच सांगत आहे की असे सामर्थ्य आम्हांस येशूमध्येच मिळते.

पुष्कळ लोक अशा सामर्थ्याचा त्याच्या जीवनात अनुभव घेऊ पाहतात पण त्याला मुक्त कसे करावे हे समजत नाही. हे सामर्थ्य मुक्त करण्याची मुख्य किल्ली म्हणजे विश्वासाने त्याचे नाव घेणे.

पवित्रशास्त्र सांगते की येशूचे नाव सर्व नावांपेक्षा श्रेष्ठ आहे; ते सर्वश्रेष्ठ नाव आहे, ते नाव स्वर्गात व पृथ्वीवर महासामर्थ्यशाली

आहे–आणि त्याचे नाव आम्हांस दिले आहे. आम्हाला एकच गोष्ट करावयाची आहे ती म्हणजे विश्वास ठेवायचा आहे.

आम्ही काय विश्वास धरतो?

योहान 20:31 मध्ये आम्ही वाचतो... *येशू हा देवाचा पुत्र (ख्रिस्त) आहे असा तुम्ही विश्वास ठेवावा, आणि विश्वास ठेऊन तुम्हाला (त्याच्या) नावाने जीवन प्राप्त व्हावे, म्हणून ही लिहिलीं आहेत.*

जेंव्हा आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवतो, तेंव्हा त्याच्याशी वैयक्तिक नाते ठेवा व त्याच्या नावाने प्रार्थना करा, तेंव्हा देवाचे सामर्थ्य तुम्हांकरिता मुक्त केले जाईल.

त्या नावामध्ये विश्वासाने येशूमध्ये देवाने आम्हाला सर्वकाही पुरविले आहे–एकसारखी प्रिती, शांती, आनंद, आरोग्य, भरभराट, संरक्षण, शक्ती वर्ग ज्या गोष्टी कोणत्याही परिस्थितीत विजयापेक्षा जास्त व आमची परिस्थिती पुर्णपणे बदलविण्याचे सामर्थ्य ठेवतात.

थोडावेळ यावर विचार करा. जेंव्हा आपण देवाची लेकरे होतो तेंव्हा त्याच्या नावातील सर्वगोष्टी आमच्या होतात.

## *मार्गदर्शनहीन आणि सामर्थ्यहिन*

*ज्ञानाच्या अभावी माझ्या लोकांचा नाश झाला आहे....*

*होशेय 4:6*

ख्रिस्तीजनांसहित – लक्ष्यावधी लोकांना या नावात सापडणाऱ्या महान सामर्थ्याचा सुगावा लागलेला नाही.

हे सत्य आहे हे मला माहित आहे, कारण मी पण त्यापैकी एक होते.

मी प्रत्येक आठवड्याला चर्चला जाणारी ख्रिस्ती होते; कधी-कधी आठवड्यातून पुष्कळवेळा चर्चला जात असे, कारण मी चर्चच्या मंडळावर व शुभवर्तमान समूहात होते. व माझे पती त्याच चर्चचे वडिल होते. पण येशूच्या नावामधील सामर्थ्याचा सुगावा मला नव्हता. आजच्या इतर पुष्कळ, (सर्व नाही) ख्रिस्तीजनासारखेच मी होते.

मी सामर्थ्यहीन आणि मार्गदर्शनहीन होते. तेंव्हा मी येशूच्या नावाचा “उपयोग” केला.

मला शिकविल्याप्रमाणे प्रार्थनेच्या शेवटी मी त्याचा वापर केला. पण हे करताना मी काय करीत आहे. हे मला समजत नसे. म्हणून मी सामर्थ्यहीन जीवन जगत होते. माझ्या व कुंटूबांच्या आणि इतरांच्या जीवनात खरा बदल आणण्यास मी सामर्थ्यहीन होते.

तुम्हाला माहिती आहे का? की तुम्ही ख्रीस्ती जीवन सामर्थ्याविना जगत आहात?

सांगायला दुःख होते की **सामर्थ्ययुक्त** ख्रिस्ती जीवन जगणाऱ्यांपेक्षा **सामर्थ्यहीन** ख्रिस्ती जीवन जगणारे ख्रिस्ती कदाचित पुष्कळ आहेत. परंतु देवाची इच्छा ही नाही. पूर्वीच्या मंडळांचा मार्गही असा नव्हता.

# *पहिल्या मंडळीचे सामर्थ्य*

*प्रेषित मोठ्या सामर्थ्याने प्रभू येशूच्या पुनरुत्थानाविषयी साक्ष देत होते...*

*प्रेषित 4:33*

पहिल्या मंडळीमध्ये पुष्कळ अद्‌भूत गोष्टी का घडत होत्या? प्रेषितांची कृत्ये या पुस्तकात आपण का वाचतो की पुष्कळ लोकांच्या जीवनांत आरोग्य, कष्ट अत्याचारांपासून सुटका या घडामोडी घडल्या?

पहिल्या मंडळीमधील ख्रिस्तीजन का मोठे चमत्कार, चीन्ह व आश्चर्य करीत होते?

कारण त्यांना येशूच्या नावामधील सामर्थ्य माहिती होते, व त्या नावाचा उपयोग सातत्याने देवाच्या इच्छेने ते करीत होते. (पुढे आम्ही पहाणार आहोत की त्याचा उपयोग अयोग्य प्रकारे करु नये)

जन्मजात पांगळ्या मनुष्यासाठी प्रेषित पेत्राने जेंव्हा येशूच्या नावाचा उपयोग करुन प्रार्थना केली, तेव्हा त्या पांगळ्या मनुष्याला आरोग्य मिळाले. (प्रेषित 3:1-8)

देवाचे राज्य व नाव याविषयी फिलीपाने मोठ्या जनसमुदायाला सुवार्ता, सांगीतली आणि फिलिप देवाचे राज्य व येशू ख्रिस्ताचे नांव ह्याविषयींची सुवार्ता सांगत असता लोकांचा विश्वास बसला आणि पुरुष व स्त्रिया ह्यांचा बाप्तीस्मा झाला. (प्रेषित 8:12)

पौलाने पिशाच्च लागलेल्या मुलीमधून येशूच्या नावाने आज्ञा करुन तात्काळ पिशाच काढले. तिच्या अंगात येत असे (ती दैवप्रश्न

व भविष्ये सांगत असे.) ...मागे बसून तो त्या पिश्चाला म्हणाला....तू हिच्यामधून निघून जा, आणि ते तात्काळ निघून गेले. (प्रेषित 16:16-18)

यावरुन सहजरीत्या आम्हांस समजते की पहिल्या मंडळीतील शिष्यांना येशूच्या नावाचे सामर्थ्य व त्याचा योग्य उपयोग करुन आशीर्वाद मिळवणे. व इतरांनाही तो देणे हे चांगले समजले होते.

## *तारणाकरिता नावातील सामर्थ्य*

*...बरे करण्याकरिता तू आपला हात लांब करीत असता आपल्या दासांनी पूर्ण धैर्याने तुझे वचन सांगावे असे कर;* ***तुझा पवित्र सेवक येशू ह्याच्या नावाने चिन्हे व अद्‌भुते घडावी असेहि कर.***

*प्रेषित 4:30*

वरिल वचनानुसार आम्हांस कळते की येशूच्या नावात सामर्थ्य आहे, व आमच्या कठिण प्रसंगात, रोगात व दुष्ट आत्मांपासून अद्‌भूतरित्या चिन्हे व चमत्कारासहीत आम्हांस ते सुटका देते. देवाचे वचनही आम्हास प्रकट करते की जो कोणी परमेश्वराच्या नावाने त्याचा धावा करील तो तरेल. (प्रेषित 2:21)

पवित्र शास्त्र सांगते की फक्त येशूच्या नावात तारण आहे आणि त्याच्या नावाशिवाय दुसऱ्या कोणत्याही नावात तारण नाही. (प्रेषित 4:12)

तारण म्हणजे फक्त येशूच्या नावावर विश्वास ठेवण्याचा एकमेव निर्णय होय. (जर आपण हे अद्याप केले नसेल व आता करण्याची इच्छा असेल तर या पुस्तकाच्या शेवटी लिहीलेली प्रार्थना आपण करु शकता.)

कैलस्सै 2:9 आम्ही वाचतोः *कारण ख्रिस्ताच्या ठायीच देवपणाची सर्व पूर्णता मूर्तिमान् वसते. आणि जो सर्व सत्तेचे व अधिकाराचे मस्तक आहे. त्याच्यामध्ये तुम्ही पूर्ण केलेले आहा.*

पिता, पुत्र व पवित्र आत्मा याद्वारे आम्हांस (आत्मीक पुर्णता) मिळते. आणि येशू सर्व सत्तेचे व अधिकाराचे मस्तक आहे.

हे लक्षात घ्या की देवाचे सर्वसामर्थ्य येशूच्याच नावात आहे, आणि ते नाव मंडळीला देण्यात आले आहे.

त्याचे गौरवी नाव सामर्थ्ययुक्त आहे. व ते सामर्थ्य मुक्त होण्याकरिता पुढे पुस्तकात चर्चा केल्याप्रमाणे नितांत विश्वासाची आवश्यकता आहे. जर आमच्या जीवनात सामर्थ्याचा अभाव आहे तर मग आमचा येशूच्या नावावरील विश्वास कमी आहे.

आम्ही येशूचे नाव घेऊन प्रार्थना, दुष्ट आत्मांना धमकावणे हे करु शकतो पण त्याचा परिणाम आम्हांस जोपर्यंत आम्ही विश्वासाने हे करीत नाही तोपर्यंत पाहावयास मिळणार नाही. म्हणून आमच्या विश्वासाला प्रथम गती देणे आवश्यक आहे.

## *नाव आध्यात्मीक शस्त्रासारखे आहे*

*कारण आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत तर तटबंदी*

*जमीनदोस्त करण्यास ती देवाच्या दृष्टीने समर्थ आहेत.*

*2 करींथ 10:4*

त्यामुळे देव सामर्थ्र्ययुक्त स्त्री पुरुषांना गती देत आहे. त्याचे कारण हेच की आम्ही युद्धात (आत्मीक युद्ध) आहोत... *कारण आपलें झगडणे रक्तमासाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर अधिकाऱ्यांबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतीबरोबर आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे.* (इफिस 6:12)

हे युद्ध या दैहिक जगात लढता येत नाही. आमचे शत्रू सैतान व त्याचे दुरात्मे आहेत त्यामुळे आध्यात्मीक शस्त्रांनी आध्यात्मीक क्षेत्रात आम्ही त्यांच्याशी लढू शकतो.

2 करिंथ 10:4 सांगते... आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्यास ती देवाच्या दृष्टीने समर्थ आहेत. (बंधनात अडकवीणाऱ्या गोष्टी)

सर्वात सामर्थ्र्ययुक्त असे आध्यात्मीक शस्त्र देवाने आम्हांस दिले आहे ते म्हणजे येशूचे नाव. ते आत्मीक युद्धाचे मस्तक आहे. (लूक 10:17)

## *तुमच्या विश्वासाप्रमाणे तुम्हांस प्राप्त होवो*

*पण येशू तेथून पुढे जात असतांना दोन आंधळे त्याचे मागे मागे चालत जाऊन मोठ्याने बोलले, अहो, दावीदपुत्र, आम्हांवर दया करा!*

*तो घरांत गेल्यावर ते आंधळे त्याच्याजवळ आले; तेंव्हा येशू त्यांना म्हणाला, हे करावयास मी समर्थ आहे असा तुम्ही विश्वास धरिता काय? ते त्याला म्हणाले होय प्रभू.*

*तेंव्हा त्याने त्यांच्या डोळ्यांस स्पर्श करुन म्हटले,* ***तुमच्या विश्वासाप्रमाणे (जे सामर्थ्य माझ्यात आहे) तुम्हांस प्राप्त होवो.*** *तेंव्हा त्यांना दृष्टि आली....*

*मत्तय 9:27-30*

येशूच्या नावातील सामर्थ्य मला माहित आहे कारण गेली वीस वर्षे मी त्याच्या नावात प्रार्थनापूर्वक सुवार्ता गाजवीत आहे. परंतु काही दिवसांपूर्वी देवाने माझी भेट घेऊन त्याच्या नावात माझ्या विश्वासाला योग्य गती दिली व जे देवाचे पूर्ण सामर्थ्य व सत्ता प्रत्येक विश्वासू व्यक्तींना घेरते त्याची नव्याने जाणीव करुन दिली.

आता जेंव्हा मी म्हणते की देवाने माझी "भेट" घेतली म्हणजे मी त्याला पाहिले असे नव्हे तर येशूच्या नावासंबंधी देवाने माझ्या अतःकरणात कार्य सुरु केले.

त्या नावासंबंधी पवित्रशास्त्रातील वचनांवर मी मनन करीत आहे. आणि जेंव्हा सेवेकरिता मी बाहेर जाते त्यापूर्वीही मनन करते. त्यामुळे माझ्या विश्वासाला बळकटी येते व जेंव्हा मी लोकांसमोर उभे राहाते तेंव्हा विश्वासाने संपूर्ण हृदयाने मी त्यांच्यासाठी प्रार्थना करते की त्या सभेच्या परिसरात असणाऱ्या लोकांच्या जीवनातील बंधनाचे जू मोडून जावे.

मी व्यासपीठावर उभी राहू शकत नाही, व खरी प्रार्थनाही करु शकत नाही जोपर्यंत माझा विश्वास नाही की या ठीकाणी काहीतरी चमत्कार घडणार आहे.

जेंव्हा येशूच्या नावात आम्ही विश्वास धरतो तेंव्हा कोणत्याही परिस्थितीला, आव्हानांना आमच्या विश्वासाने येशूच्या नावातील सामर्थ्याद्वारे आम्ही लढा देऊ शकतो.

## *विश्वासाची शक्ती*

*ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या (मसीहा स्वतः) वचनाच्या द्वारे होते.*

*रोम 10:17*

विश्वास एक शक्ती आहे. व येशूने दाखविले आहे की आम्हामध्ये असणारी ही शक्ती प्रार्थना आणि आमच्या मुखाच्या शब्दांद्वारे कार्य करु शकते. (मत्तय 9:29)

*रोम 10:17 वचनात सांगितले... विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्या द्वारें होते.*

जर आरोग्यासंबंधी देवाचे वचन आपण ऐकाल तर तुमच्या विश्वासाला बळकटी येऊन तुम्हांस आरोग्य मिळेल. जर पैशांविषयी आपण वचन ऐकत असाल तर त्या क्षेत्रात तुमचा विश्वास उत्तेजन होईल.

जेंव्हा तुम्ही येशूच्या नावासंबंधी देवाचे वचन ऐकाल तेंव्हा त्याच्या नावावरील तुमचा विश्वासही बळकट होईल. हे पुस्तक वाचत

असतांना देवाच्या नावाच्या सामर्थ्याची वचन मोठ्याने बोला आणि जेंव्हा तुम्ही हे पुस्तक वाचून संपवाल तेंव्हा वेगळेपणाने तुम्ही प्रार्थना कराल. व प्रार्थनेत जे तुम्ही मागत आहात त्यात तुमचा विश्वासही वाढू लागेल.

तसेच पवित्रशास्त्र येशूच्या नावासंबंधी जे सांगते त्यावरील विश्वासाने आमचा आत्मविश्वासही वाढीस लागेल, त्यामुळे देवाने आमच्या जीवनासाठी ठेवलेल्या योजना व आशीर्वादाचा आनंद आम्हांस जीवनाच्या अंतिम धावेपर्यंत घेता येईल! सामर्थ्य व गौरवशाली–**सर्व श्रेष्ठ येशूच्या नावात तुमचा विश्वास खंबीरच होईल.**

# 2
# नाव आणि विश्वास!

*देवाची वचने कितीहि असोत, त्याच्या ठायी होय हे आहे; म्हणून आम्ही देवाच्या गौरवाला त्याच्याद्वारे आमेन म्हणतो.*

*2 करिंथ 1:20*

देवाच्या वचनात असणारे पुष्कळ वचने आम्ही वाचतो पण आमच्या जीवनात ते कार्यच करीत नाही.

हे का होते? यामध्ये काय समस्या आहे?

प्रथम पवित्र शास्त्रातील वचने लिहिली म्हणून नाही तर आमच्या वचनावरील विश्वासानेच देवाचे वचन आमच्या जीवनात कार्य करते.

केवळ येशूवरील विश्वासाने देवाची वचने कार्य करीत नाहीत तर जे वचन देव बोलला आहे ते सत्य आहे, याविश्वासाने वचने कार्य करतात.

ज्याप्रमाणे आम्ही इफिस 1:19 मध्ये वाचतो. *जे आपण विश्वास ठेवणारे त्या आपणाविषयीच्या त्याच्या सामर्थ्याचे अपार महत्त्व ते*

*काय हे तुम्ही त्याच्या तत्त्वशाली पराक्रमाच्या कृतीवरुन ओळखून घ्यावे.*

आता हे वचन केवळ लिहिले म्हणून नव्हे, तर “मला माहिती असले पाहिजे की जे येशूवर विश्‍वास ठेवतात त्यांच्याकरिता हे बलशाली अपार सामर्थ्य उपलब्ध आहे.”

“येशूवरील विश्‍वास ठेवणाऱ्यांनी समजून घ्यावे की हे अपार सामर्थ्य विश्‍वासनाऱ्यांसाठीच आहे.”

बहुदा आम्ही असे समजतो की येशू तारणारा आहे या सर्वसाधारण विश्‍वासाने, पवित्रशास्त्रातील सर्व वचने आमच्या जीवनात कार्य करतील.

पण विश्‍वास याप्रकारे कार्य करीत नाही. आम्हाकरीता विशीष्ट असणारे वचने आम्ही विश्‍वासानेच घेतली पाहिजेत.

देवाच्या वचनातील एक उदाहरण पाहा.

## *विश्‍वासाद्वारे चमत्कार*

*आणि विश्‍वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील. ते माझ्या नावाने भुते काढतील, नव्यानव्या भाषा बोलतील,*

*सर्प उचलतील, व कोणताहि प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही; त्यांनी दुखणाइतांवर हात ठेविले म्हणजे ते बरे होतील.*

*मार्क 16:17,18*

वचन 19 प्रमाणे प्रभू येशू स्वर्गात देवाच्या उजवीकडे बसण्यास जाण्याअगोदरच येशूने वचनाद्वारे शिष्यांना सामर्थ्य व अधिकाराची ही वचने दिली.

मला असे वाटत नाही की ज्यांनी येशूवर विश्वास ठेवला त्यांच्या जीवनात या सर्व गोष्टी घडतात. **पण माझा हा विश्वास आहे की जे चमत्कारांवर व येशूवरील विश्वासाने हे चमत्कार चिन्ह घडणारच असा विश्वास धरतात त्याही जीवनात ते घडतात.**

येशू ख्रिस्ताची मंडळी अविश्वासनाऱ्यांनीच भरली आहे. पूर्वी लिहिल्याप्रमाणे मला हे माहिती आहे, कारण मी पण पुष्कळवर्षे सामर्थ्यहीन, नवीन जीवन मिळालेली ख्रिस्ती होते, तेंव्हा माझा मृत्यू झाला असता तर मी स्वर्गातपण गेले असते पण मी सामर्थ्यहीन जीवन जगत होते.

मी येशूख्रिस्तावर विश्वास ठेवला पण त्याच्या नावातील सामर्थ्यावर मी विश्वास ठेवला नाही कारण कोणी मला त्या सामर्थ्याविषयी शिक्षण दिले नाही. कोणी त्यावर उपदेश करतांना मी ऐकले नाही मला वाटत असे की केवळ देवामध्ये सामर्थ्य आहे व त्याला वाटले तर त्याचा उपयोग तो माझ्या जीवनात करील. व जर उपयोग केला नाही तर त्यासंबंधी मी काहीच करु शकत नाही.

येशूच्या नावात प्रार्थना करण्याच्या सामर्थ्याविषयी मला काहीच माहित नव्हते. तरी मी माझ्या प्रार्थनेत येशूचे नाव घेत होते. व मी काय करत आहे हे मला सजत नव्हते.

जेंव्हा पवित्र आत्माने माझा बाप्तिस्मा झाला तेंव्हा मला विश्वासनाऱ्यांचे अधिकार समजले की आम्हाजवळ सामर्थ्य आहे. जेव्हा पवित्र आत्माने आम्ही बाप्तिस्मा पावलो (आमच्या जीवनात त्याची इच्छा पुर्ण होण्याकरीता दिलेले पवित्र सामर्थ्य) तेंव्हा आमचे तारण होते, आम्ही देवाकडे मागतो व प्रार्थना करतो.

जेंव्हा आम्ही येशूख्रिस्तावरील विश्वासूजण पवित्र आत्माने बाप्तिस्मा पावतो तेंव्हा देवाचा आत्मा देवाचे महान सामर्थ्य घेण्यास, समजण्यास, अनुभवण्यास आमचे साह्य करतो.

जेंव्हा मी विश्वास ठेवायला सुरुवात केली तेंव्हा मला समर्थही उपलब्ध झाले, व गांभीर्याने येशूच्या नावाने मी त्याचा उपयोग करण्यास सुरुवात केली. आणि माझ्या जीवनात व माझ्या अवतीभवती असणाऱ्या लोकांमध्ये सामर्थ्ययुक्त गोष्टी घडतांना मी पाहू लागले.

**केवळ येशूवरील विश्वासच आवश्यक नाही. तर त्याच्या नावातील सामर्थ्यावर आणि आम्हाजवळ ते सामर्थ्य आहे, असा विश्वास आम्ही ठेवला पाहिजे.**

तुम्ही विश्वास ठेवला व कबूल करीता का? की तुम्ही अशक्त आहात? किंवा सामर्थ्ययुक्त आहात?

जर आम्हांजवळ हे अपार सामर्थ्य आहे तर कळत-नकळत आम्ही आमच्या परिस्थितीत रडालील गोष्टींचा उच्चार करणार नाही. “मी अजीबात ते सहन करु शकत नाही. –मला मारले.”

“हे असे चालणार नाही–हे फारच झाले;” “मला असे वाटते की मी पडतोय–सर्व खापर माझ्याच डोक्यावर फुटतंय. हे माझ्यासाठी

फार कठीण आहे, मी उभा राहू शकत नाही. माझ्याच्याने नाही .....माझ्याच्याने नाही.....नाही."

समस्या ही आहे की आमच्याजवळ सामर्थ्य आहे असा खरचं आम्ही विश्वास धरत नाही. आम्ही सामर्थ्य, चिन्ह याविषयी चर्चा करतो पण पवित्रशास्त्र काय म्हणते यापेक्षा मला काय वाटते यावर आम्ही विश्वास ठेवतो.

**कधी-कधी आम्ही आमच्या भावनांना आमचा देव करतो.**

त्यामुळे कदाचीत चिन्ह चमत्कार घडत नाही कारण तसा आम्ही विश्वास धरत नाही.

## *केवळ विश्वास!*

*येशू त्याला म्हणाला, शक्य असेल तर असे कसे म्हणतोस? विश्वास बाळगणाऱ्याला सर्व कांही शक्य आहे.*

*मार्क 9:23*

प्रत्येकवेळी जेंव्हा मी सेवा करण्यास लोकांसमोर उभी राहाते तेंव्हा मी विश्वास ठेवते की पवित्र आत्मा मला चालवित आहे. व लोकांच्या गरजा भागविण्याकरिता तो माझ्यामार्फत कार्य करील (1 करिंथ 12:4-11 पाहा)

जेंव्हा व्यासपीठावर मी उभी राहाते तेंव्हा मी काय उपदेश करणार आहे याची मला माहिती असते. पण त्यानंतर सभेत काय होणार

याची कल्पना ही मला नसते. पण पवित्र शास्त्राच्या वचनाप्रमाणे मी विश्वास ठेवते की चिन्हे घडणार (मार्क 16:17,18) कारण मी विश्वास धरते की देव पवित्र आत्माने मला चालवित आहे.

त्याचा परिणाम (हे मी गर्वाने सांगत नाही) आमच्या सभा उत्तम होतात हे असेच घडत नाही. तर प्रत्येक सभेनंतर “देवाने आम्हांस साह्य केले! तो उत्तम आहे!” असे म्हणत आम्ही घरी जातो.

सभेत देवाचे सामर्थ्य जाणवू शकते. त्याकरिता प्रत्येक सभेत अभिषेकाची आवश्यकता आहे. एका सभेत आम्ही पाहिले की तेराशे लोक पवित्र आत्माने बाप्तिस्मा पावले. तसेच नेहमी लोकांना शारीरिक, भावनेने, आत्मीक आरोग्य मिळाले हे केवळ येशू व त्यावरील आमच्या विश्वासाने घडत आहे हे सर्व येशू व त्याचे चांगूलपण, कृपा, व त्याचा अद्भूत नावातील सामर्थ्याने शक्य आहे.

## *येशूकडे पहा*

*त्याच्याच नांवावरील विश्वासामुळें त्या नांवाने ह्या ज्या माणसाला तुम्ही पाहता व ओळखता त्याला शक्तिमान केलें आहे.*

*प्रेषित 3:16*

जर नावातील सामर्थ्याचा आस्वाद आपणास घ्यावयाचा असेल तर आम्ही आमच्याकडे व मला शक्य नाही याकडे न पाहता, नेहमी येशू व जो सर्वकाही तो आहे आणि जे काही तो त्याच्या इच्छेने आम्हांसाठी आमच्यामार्फत करु इच्छितो त्यांकडे पाहिले पाहिजे.

माझ्या सेवेत मी स्तुती आराधना समुहाला सांगते की जेंव्हा तुम्ही गायला सुरुवात कराल तेंव्हा, दुष्ट आत्मे पळतील, लोकांना तारण प्राप्त होईल, आरोग्य मिळेल आणि पवित्र आत्माने लोक भरतील असा विश्वास धरा. माझ्या सभांमध्ये व्यर्थ वेळ घालवणे व माझा प्रभाव लोकांवर पाडण्याचा प्रयत्न मी करीत नाही. तर बंधनातून लोकांची मुक्तता व्हावी याच एका कारणाकरिता मी तेथे असते. जर तसा मी विश्वास धरीत नाही तर मग मी माझ्या घरीच माझी लेकरे नातवंडे यामध्येच राहीन.

पण मी संपूर्ण हृदयाने विश्वास ठेवते की या सभेत हजारो लोकांच्या गरजा भागवल्या जातील. तसे जेंव्हा मी येशूच्या नावात प्रार्थना करते तेंव्हा हे घडणार असा ही विश्वास धरते. **मी हे करायच म्हणून करते असे नाही, तर मी विश्वास धरते की याद्वारे सेवा व जीवनांचा बदल होत आहे!** जर आपल्या जीवनात अव्यवस्था असेल व आलेल्या परिस्थितीवर आपण्यास मात करता येत नसेल तर आपला विश्वास तपासून पाहा.

लक्षात ठेवा येशूने स्वतः म्हटलेः *...तुमच्या विश्वासाप्रमाणे तुम्हांस प्राप्त होवो* (मत्तय 9:29)

## *विश्वास आणि प्रार्थना*

तुम्ही प्रार्थना करुन जे मागाल ते आपल्याला मिळालेच (विश्वास व आत्मविश्वास) आहे असा विश्वास धरा म्हणजे (ते तुम्हाला मिळेल)

*मार्क 11:24*

तुम्ही म्हणाल की “मी येशूच्या नावात प्रार्थना करतो पण त्याचे काही परिणाम मला अद्याप दिसत नाहीत.”

आपण दिवसातून एकदा येशूच्या नावाने प्रार्थना करीत असाल पण संपूर्ण दिवसात नकळत गांभीर्याने त्याचा नावाचा वापर करीत नसाल. कींवा येशूच्या नावात आपण प्रार्थना करीत असाल पण प्रार्थनेच्या शेवटी जादूसारखा त्याचा वापर करीत असाल!

जर असे असेल तर आतापासून जेंव्हा येशूचे नाव आपण घ्याल तेंव्हा अपार सामर्थ्य आम्हांस उपलब्ध झाले आहे असा विश्वास धरा.

जेंव्हा आम्ही हे करतो तेंव्हा मला सामर्थ्याची जाणीव होईल. व ते माझ्यामार्फत कार्य करीत आहे हे स्पष्ट होईल.

नावात सामर्थ्य आहे हे पवित्र शास्त्र सांगते तो काही विनोद नाही.

जेंव्हा येशूचे नाव दूरदर्शनद्वारे (television) मी सांगते तेंव्हा माझा विश्वास आहे की माझ्याद्वारे हे सामर्थ्य हवेतील लहरींद्वारे जे लोक विश्वासाने ऐकत आहे अशा लोकांच्या घरात त्यांच्या गरजा भागविण्याकरता कार्य करते.

येशूच्या नावात तारण आहे. त्या नावात नीराशा संकट यातून सुटका आहे. त्या नावात घडामोडी आहेत. जे काही सर्व त्या नावात आहे ते मिळविण्यासाठी केवळ गांभीर्याने विश्वास ठेवला पाहिजे.

## *वचन आणि नाव*

*तुम्ही माझ्यामध्ये राहिला व माझी वचने तुम्हांमध्ये*

*राहिली तर जे कांही तुम्हांला पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हाला प्राप्त होईल.*

*योहान 15:7*

मला वाटते की आम्ही ख्रिस्तीजण संदर्भाव्यतिरिक्त हे वचन येशूजवळ उचलून धरतो. आणि असा विचार करतो की आम्हांला वाटेल ते आम्ही मागू व प्रार्थनेच्या शेवटी येशूच्या नावाने मागतो म्हणून आम्हांस ते मिळावे.

देवाच्या वचनांचा उलगडा करतांना इतर वचनाच्या प्रकाशात त्याचा उलगडा करावा. म्हणजे योहान 15:7 हे वचन 1 योहन 5:14,15 या संर्दभाशिवाय स्पष्टीकरण करता येत नाही. त्यां वचनाचा अर्थ आहे की जर त्यांच्या इच्छेप्रमाणे कांही मागितले तर तो आपले ऐकेल.

*योहान 15:7 प्रमाणे प्रभू म्हणतो जर तुम्ही माझ्यामध्यें राहिला, व माझी वचने तुम्हांमध्ये राहिली, तर जे काही तुम्हाला पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हांला प्राप्त होईल.*

मला वाटत होते की माझ्या वाचनातील हे एक आश्चर्यकारक वचन आहे. मजमध्ये राहाणे (चिटकून राहाणे) म्हणजे "विसावा किंवा वस्ती करणे... कायम...भक्कम व स्थावर न बदलणारे" जेव्हा मी ख्रिस्तामध्ये राहू लागले तेंव्हा मी शिकले की माझी व प्रभूची इच्छा एक झाली आहे. त्यामुळे जी प्रभूच्या इच्छेशिवाय कोणतीच गोष्ट माझ्या जीवनात मला नको आहे.

आज जर मी वचनाच्या आंधारानुसार काही मागत असेल तर मी प्रभूसमोर जाऊन म्हणते “प्रभू हे तुझेच शब्द आहेत व माझ्या जिवनात ते पूर्ण व्हावे असे मी अपिक्षेत करते.”

पण आम्ही पुष्कळ अशा गोष्टींसाठी प्रार्थना करतो ज्याला विशिष्ट देवाच्या वचनाचा आधार नसतो. अशा परिस्थितीत आम्ही अशी प्रार्थना करावी. “प्रभू हा माझा विश्वास आहे, व या परिस्थितीत मला हे तू दें तू मला देशील हा मी विश्वास धरतो, पण हे योग्य नसेल तर मला देऊ नको कारण मला केवळ तुझी इच्छा पाहिजे.”

## *माझ्या इच्छेप्रमाणे नको, तुझ्या इच्छेप्रमाणे*

*मग त्यांच्यापासून सुमारे धोंड्याच्या टप्प्याइतका तो दूर गेला; आणि त्याने गुडघे टेकून अशी प्रार्थना केली.*

*हे पित्या, तुझी इच्छा असली तर हा प्याला माझ्यापासून दूर कर तरी माझ्या इच्छेप्रमाणे नको, तुझ्या इच्छेप्रमाणे होऊ दे.*

*लुक 22:41,42*

माझ्या लहान मुलाचा विवाह एकोणीस वर्षाचा असतांना झाला. व तो लहान आहे हे माहित असताना आम्ही त्या विवाहाला तयार झालो. मुलीचे वय अठरा होते तीचे घर देवाची सेवा करणारे होते व तीचे प्रभूबरोबर दृढ संबंध होते. त्यामुळे ते कुटूंब फारच आकर्षक होते.

त्यांना लग्नाचे बक्षीस म्हणून काही पैसे मिळाले, काही पैसे त्यांच्या बचतीतून त्यांना मिळाला त्यामुळे त्यांनी स्वतःचे घर घेण्याकरिता काही प्राथमिक पैसे दिले, जे जास्त महाग नव्हते. कारण माझ्या पतीने पैसे हाताळण्याचे पुष्कळ तत्त्वे माझ्या मुलाला शिकवले. त्यामुळे त्याला वाटते की भाड्याने घर घेण्यापेक्षा स्वतःचे घर असावे.

म्हणून आम्ही त्याच्याकरिता घर पाहाण्यासाठी गेलो व त्यांना परवडण्याजोगे असे घर त्यांना सापडले व त्याविषयी त्यांच्या भावनामध्ये खळबळ उडाली.

दुसऱ्या दिवशी आमच्या मुलांनी आम्हांस सांगितले. “चॅरीटी, व मी काल त्या घरासमोर बसून प्रार्थना केली की” जर तुझी इच्छा असेल तर ते घर आम्हांस दे. व जर तुझी इच्छा नसेल तर आम्हांस माहिती आहे की यापेक्षा उत्तम असे तु आम्हाला देशील पण तुझ्या इच्छाप्रमाणे होवो.

त्यानंतर पुन्हा ते घर विकत घेण्याअगोदर दुसऱ्या व्यक्तीनेच ते विकत घेतले.

त्याने आम्हांस हे सांगितल्यावर आम्ही निराश झालो. पण मी विश्वास ठेवेला की ते जर विकले गेले तर त्यापेक्षा चांगले घर प्रभू आम्हाला देईल, त्याकरिता आम्ही धीराने वाट पाहू याप्रमाणे जेव्हा आमची खात्री नाही की ही प्रार्थना देवाच्या वचनावर आधारीत नाही तेंव्हा वरील प्रमाणे प्रार्थना करावी.

जर माझा मुलगा व सुन यांनी त्या घरासमोर बसून हीं प्रार्थना केली असती की “येशूच्या नावात हे घर आमचे आहे, व आम्हाला

आता दुसरे घर नको, बापा हेच घर आम्हांस पाहिजे, व आम्हास माहिती आहे की तु आम्हांला हे देशील, कारण येशू म्हणतो माझ्या नावाने जे काही तुम्ही मागाल ते तुम्हांस मिळेल!" तर ते शाहाणपणाचे ठरले नसते.

जे काही प्रार्थनेने आम्ही मागतो ते जर देवाची इच्छा असेल तर आम्हांस मिळेल, नक्किच आमच्या इच्छेप्रमाणे नाही.

देवाची इच्छा प्रार्थना व देवाचे वचन वाचल्यामुळे कळते मग जेंव्हा वचनाप्रमाणे आम्ही आमच्या विश्वासाचा उपयोग करतो तेंव्हा आमचे जे आहे ते हक्काने आम्ही येशूच्या नावाने मागून उत्तम परिणाम पाहतो.

# 3
# नावाचा उपयोग

*तेंव्हा असे होईल की, जो कोणी परमेश्वराच्या नावांने त्याचा धावा करील तो तरेल.* *प्रेषित 2:21*

माझे एक मित्र ज्यांना मी बायबल कॉलेजमध्ये शिकवले व एकां चर्चचे ते पाळक झाले ते एकांतात देवाचे नाव कसे घ्यावे याचे सत्य उदाहरण येथे देत आहेत. एकेदिवशी त्यांचा तीन की चार वर्षांचा मुलगा त्यांच्याबरोबर गाडीमध्ये होता. व्यस्त रस्त्यावरुन ते उजव्या हाताला वळण्याची तयारी करीत असता, त्यांना माहित नव्हते की त्यांच्या मुलाच्या बाजुचे दार लावले नव्हते. व वळण घेतांना सर्व भार त्या दरवाज्यावर आला. मुलाने सीट बेल्ट सुधा लावले नव्हते.

जेव्हा त्याने गाडी वळवीली तेंव्हा ते दार उघडले व भर रस्त्यात हा मुलगा त्या चौकात व्यस्त रस्त्यामध्ये पडला! वडिलांनी पाहिले की चारीही बाजूंनी भरघाव वेगाने गाड्या येत आहेत व मुलगा पडला त्या रस्त्याने फारच वेगाने गाड्यांचा समुह येत आहे व काही क्षणात त्या मुलाच्या अगांवरुन जाणार तेवढ्यात एकच गोष्ट ते करु शकले की मोठ्याने “येशू!” च्या नावाने ओरडले.

वडिलांनी लगेच गाडी थांबवली व मुलाकडे झेप घेतली तो त्यावेळी अतिशय सुरक्षीत असा होता. मग वळून त्याने ज्या व्यक्तीची गाडी त्याच्या अंगावरुन जाणार होती त्या चालकाकडे पाहून त्याला वेळेवर गाडी थांबवल्याबद्दल "धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद!" म्हटले व तो चालक जो त्या मुलावरुन गाडी नेणार होता त्याकडे पाहिले तो फारच भयभीत झाला होता, त्यानेही सांत्वन केले.

वडिल म्हणाले काही काळजी करु नका "माझा मुलगा व्यवस्थीत आहे, त्याला काही लागले नाही, त्याविषयी चिंता करु नका, पण देवाने तुम्हाला गाडी थांबण्यास साह्य केले म्हणून त्याला धन्यवाद द्या!"

हे वाक्य वडील सातत्याने चालकाला बोलत असता चालक म्हणाले "तुम्हाला समजत नाही काय! तुम्हाला समजत नाही!" वडिल म्हणाले काय समजत नाही? व चालक म्हणला की मी गाडीचे ब्रेकवर पाय सुद्धा ठेवले नव्हते.

या संकटाच्या परिस्थितीत देवाच्या नावातील सामर्थ्याने गाडी थांबवली. कारण यावेळी कोणालाही काहीच करता येत नव्हते. कसलीच योजना, किंवा विचार करण्यास तेथे वेळ नव्हता. जेथे माणसे काहीच करु शकत नाहीत तेंव्हा येशूचे नाव कार्य करते. त्यामुळे सामर्थ्याने चमत्कार झाला व त्या मुलाचे जीवन वाचले.

## *नावातील सामर्थ्य व सत्ता*

*मग त्याने बारा प्रेषितांस एकत्र बोलावून त्यांस सर्व भुते काढण्याचे व* रोग बरे करण्यांचे सामर्थ्य व अधिकार दिला; *आणि त्याने त्यांस देवाच्या राज्याची घोषणा करावयास*

*व रोग्यास बरे करावयास पाठवले.*

*लूक 9:1,2*

माझ्या सभांमध्ये उपदेशा व्यतिरिक्त सेवेला पण वेळ देण्यात येतो त्यामध्ये प्रार्थनेकरिता लोक उभे असतात तेंव्हा प्रत्येक व्यक्तीसाठी प्रार्थना करण्यास मला फार आवडते. पण सभांची व लोकांची संख्या वाढल्याने मला शक्य होत नाही.

तरी मी उभी राहून विश्वासाने येशूच्या नावात सर्व मंडळीसाठी प्रार्थना करते व मंडळीला आरोग्य मिळते की जे मी वैयक्तिकरित्या प्रार्थना केल्यानेही होते. जेंव्हा लोक सभांमध्ये ओझ्याने लादलेले, नीराश असे येतात तेंव्हा त्या दुष्ट आत्म्यांना येशूने दिलेल्या अधिकाराने धमकावताच जडपणा निघून जाऊन लोकांना त्यापांसून मुक्तता व आनंद मिळते.

पण हे बंधनांचे जू मोडण्याचे कार्य माझ्या प्रार्थना करीत नाहीत तर देवाच्या नावातील सामर्थ्य व सत्ता ते करतात माझी प्रार्थना फक्त एक सामर्थ्य वाहाण्याचे साधन आहे.

## *दिलेल्या अधिकाराचे सामर्थ्य*

*...स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे. तेंव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांस शिष्य करा, त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्यांच्या नावांने बाप्तिस्मा द्या; जे काही मी तुम्हांला आज्ञापिलें ते सर्व त्यांस पाळावयास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे.*

*मत्तय 28:18-20*

या परिच्छेदामध्ये येशू आर्वजून म्हणतो “स्वर्गात व पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे, आणि आता तो अधिकार मी तुम्हांस देतो. जे कार्य आतापर्यंत मी केले त्यापेक्षा मोठी कार्ये तुम्ही–माझ्या नावाने करा.” (योहान 14:12)

म्हणजेच येशूने त्याच्या विश्वासनाऱ्यांना त्यांच्या नावाचा उपयोग करण्याचे मुखत्यारपत्र, कायदेशीर अधिकार दिला आहे.

त्यामुळे आम्हाला सामर्थ्यहिन, मंद, अशक्त राहाण्याचे, निराश राहाण्याचे व परिस्थितीपासून पळण्याचे काहीच कारण नाही. कधी आम्हाला वाटेल की सोडून द्यावे, पळून जावे तेंव्हा समजा की आम्ही त्या उपलब्ध नावाचा उपयोग दिलेल्या अधिकाराच्या प्रमानाने करीत नाही, त्यामुळे सर्वसमयी आम्ही संघर्ष करीत राहातो, व विजय आम्हांपासून दूर जातो.

आम्ही त्या नावाचा उपयोग हलक्या पद्धतीने करण्याचे टाळावे, म्हणजे हे उद्‌गार आम्ही उच्चारणार नाही की “हे माझ्या देवा, मी फार तापट आहे;” “मी फारच थंड आहे;” “मी फार थकलो;” माझ्या देवा मी फार भुकेला झालोय; मी फार अशक्त आहे.

जेंव्हा हे गौरवयुक्त नाव आम्ही घेतो तेंव्हा त्या नावाचा मान, आदर, व त्यामध्ये असणारी सत्ता अधिकार याची ओळख ठेवावी. आम्ही हे लक्षात ठेवावे की जेंव्हा आम्ही येशूचे नाव घेतो तेंव्हा आम्ही जे काही प्रभूचे आहे ते आमच्या वातावरणात बोलवीत असतो त्याचे नाव त्याचे प्रतिनिधीत्व करते. त्याचे नाव घेताच ते त्याची जागा घेते व त्याची उपस्थिती आम्हांमध्ये येते.

हाच कायदेशीर अधिकाराचा (मुखत्यारपत्राचा) अर्थ आहे.

माझ्या मावशीचे व्यवहार करण्याचे मुखत्यारपत्र (अधिकार) मला देण्यात आला आहे, त्यामुळे त्या दिलेल्या अधिकारानुसार मी तीच्या वतीने चेकवर सही करु शकते, तीचे पैसे खर्चू शकते, तीचे बीले भरु शकते तीची मालमत्ता विकू शकते, कारण मुखत्यारपत्राद्वारे तीने तो अधिकार मला दिला आहे.

येशूने पण आम्हांसाठी हेच केले आहे. कोणत्याही परिस्थितीत सत्तांमध्ये व अधिकारांमध्ये त्याने दिलेल्या मुख्यातर पत्रानुसार बोलण्याचा अधिकार दिला आहे. व त्याचा नावाचा उपयोग करुन आम्ही ह्या अधिकाराचा उपयोग करु शकतो.

## *नाव लक्ष केंद्रीत करते!*

*ज्या मानाने त्याला वारशाने देवदूतांपेक्षा श्रेष्ठ नाव मिळाले आहे त्या मानाने तो त्यांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे.*

*इब्री 1:4*

पवित्र शास्त्रानुसार जेंव्हा येशूचे नाव घेतले जाते तेंव्हा संपूर्ण स्वर्गाचे लक्ष केंद्रीत होते.

जेंव्हा आम्ही आदराने आणि विश्वासाने व प्रामाणिक पणाने येशूचे नाव घेतो तेंव्हा स्वर्गात शू शू शू... शांतता होत असेल तर त्यात मला काही आश्चर्य वाटणार नाही.

आम्ही महत्वाच्या व्यक्तींची ओळख का करुन घेतो? कारण आम्हाला त्या नावाचा उपयोग करायचा असतो कारण त्यामुळे आम्हांलाही महत्व मिळते.

माझ्या मुलींना हे सत्य उमगले.

माझ्या कार्यालयात आलेल्या प्रत्येक फोन मी घेऊ शकत नाही, कारण ह्यामुळे मी काहीच काम करु शकणार नाही. म्हणून जेंव्हा लोक मला फोन करतात तेव्हा त्यांना माझ्या सचिवांशी बोलावे लागते अथवा त्यांचा संदेश फोन रेकॉर्डींग मशीनमध्ये सोडावा लागतो. व इतर माझ्या कार्यालयातील मुख्य व्यक्ती बाबत पण हेच आहे. कारण कामात फार व्यस्त असल्याने वैयक्तिक वेळ देता येत नाही.

काही वेळा मी घरी असतांना मी माझ्या एका मुलीला म्हणते रॉक्सनेला (आमचे मॅनेजर) फोन कर कारण मला तिच्याशी बोलावयाचे आहे.

आता माझ्या मुलीपण महत्त्वाच्या आहेत त्यांचाही सेवत आदर होतो पण त्यांना माहिती आहे की जितके माझ्या नावाकडे लोकांचे लक्ष केंद्रीत होते तेवढे त्यांच्या नावांनी होत नाही.

पण जर माझी मुलगी सॅन्ड्रा कार्यालयात फोन करुन म्हणते की मी सॅन्ड्रा बोलते मला रॉक्सेनशी बोलायचे आहे, त्याचे परिणाम तिला या वाक्यापेक्षा खालील वाक्याने जास्त पाहावयास मिळतील.

“मी माझ्या आईच्या वतीने बोलतेय, मला रॉक्सीन बरोबर बोलायचे आहे.”

माझ्या स्टाफला मी सांगून ठेवले आहे की जेंव्हा मी फोन करते तेंव्हा लगेच त्या व्यक्तीला द्या कारण नंतर मला हाच फोन करण्यास वेळ नसेल. त्यामुळे माझ्या मुलींना माहिती झाले की जर आपण आईच्या नावाने फोन केला तर लगेच आपणास उत्तर मिळेल.

अशाच प्रकारे आपण येशूच्या नावासंबंधी करावे, की त्या

नावाचा उपयोग करणे, योग्य नाव–येशूचे नाव खात्रीने आम्ही त्याचा नावाचा उपयोग करुन त्याचे लक्ष केंद्रित केले पाहिजे व जे सर्वकाही प्रभूला आमच्याद्वारे करवयाचे आहे ते मिळवले पाहिजे.

## *प्रार्थनेत नावाचा उपयोग*

> *मी तुम्हांला खचित खचित सांगतो, मी जी कृत्ये करितो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराहि करील, आणि त्यापेक्षा मोठी करील कारण मी पित्याकडे जातो. पुत्राच्या ठायी पित्याचे गौरव व्हावें म्हणून तुम्ही जे कांही माझ्या नांवाने मागाल ते मी करीन. तुम्ही माझ्या नावाने माझ्याजवळ कांही मागाल तर मी तें करीन.*
>
> *योहान 14:12-14*

मी अति धार्मिक आहे हे दाखवण्याचा प्रयत्न मी करीत नाही पण जेंव्हा मी प्रार्थना करते, तेंव्हा विशिष्ट प्रकारे मी येशूचे नाव घेते त्याचप्रमाणे मुद्दाम विशेष प्रकारे मी प्रार्थना करते. शक्यतोवर 75 टक्के माझ्या प्रार्थनेच्या वेळेत मी स्तुती आराधना करीत असते. मला माहित झाले की धन्यवाद देत विनंत्या सादर करणे योग्य आहे.

देवाला काय पाहिजे हे देवाला विचारणे चांगले आहे. येशूने आम्हांला त्याच्या नावात मागण्यास सांगितले. जर आम्ही स्तुती, आराधना करणारे असू व देवाचे आभारी असू तर प्रार्थनेत जास्तीत जास्त वेळ आम्ही देवाची स्तुती व आराधना करण्यामध्ये खर्च करु. नंतर येशूच्या नावात आमच्या विनंत्या देवाला सादर करताच प्रभू वेगाने आमच्या गरजा पुरवील.

पुष्कळ वेळेस माझ्या प्रार्थनेच्या वेळेत, जो माझा महत्वाचा वेळ आहे त्यात मी प्रभुच्या उपस्थितीत प्रवेश करते व सातत्याने प्रभुचे नाव घेत म्हणते येशू, **येशू मी तुझ्यावर प्रीती करते, तुझे नाव महान आहे, तुझे पवित्र नाम मी उंच करते.** जेंव्हा मी हे बोलते तेंव्हा मला समजते की नावातील सामर्थ्य प्रकट होऊन लोक बंधनातून मुक्त होत व सर्व बंधने तुटून पडत. जेंव्हा मी हे बोलते तेंव्हा रोग्यास आरोग्य व दुष्ट आत्मे निघून जावे हे मी अपेक्षित करते.

सामर्थ्य व अधिकार केवळ मलाच दिलेला नाही तर प्रत्येक विश्वासनाऱ्यांना ते दिलेले आहे.

तुम्हाला माहित नाही की जर तुमचे अभिषेकीत हात कोणावर ठेवून “येशूच्या नावात बरा हो” असे म्हटले तर काय घडेल पुष्कळवेळेस येशू संबंधी आम्ही गीते गात असतांना देव आम्हांस काय संदेश देत आहे ते समजत नाही.

योहान 14:12-14 मध्ये येशू म्हणतो जेंव्हा आम्ही त्याच्या नावात प्रार्थना करतो तेंव्हा संपूर्ण येशू पित्यासमोर सादर करतो.

हे मला आवडते कारण माझ्यावरील दबाव यामुळे कमी होतो मी स्वतःला सादर करीत नाही तशी आशापण नाही कारण मी चुकते व चुकीच्या गोष्टीही करते.

जेंव्हा मी प्रार्थना करते तेंव्हा म्हणते; **हे बापा येशूच्या नावात मी तुझ्यापुढे येते. विश्वासाने माझ्या जीवनावर तुझे रक्त लावते माझ्या सर्व पापांची मला क्षमा कर. सर्वश्रेष्ठ येशूच्या नावात मी तुझ्यापुढे येते.** येशू जो आहे त्यालाच मी पित्यासमोर सादर करते त्याने माझ्यासाठी केलेल्या सर्मपणाची आठवण करुन देते.... पण

आता तो एकदाच मरण पावला.... एकदाच युगाच्या समाप्तीस आत्मयज्ञ करुन पापे नाहीशी करण्यासाठी प्रगट झाला आहे. (इब्री 9:26) तो वधस्तंभावर मेला व तीसऱ्या दिवशी पुन्हा उठला. माझा विश्वास येशूमध्ये जाहीर करते ज्यामुळे माझी सर्व पातके विरुन जातात.

सभांमध्ये सेवा करतांना सामर्थ्र्ययुक्त गोष्टीची मी अपेक्षा करते. ते मी माझे स्वतःचे नावला उच्च अथवा गौरव देण्याचा मुळीच प्रयत्न करत नाही.

माझे एकच साधे काम आहे उभे रहाणे व येशूचे नाव घेणे तसेच लोकांसाठी प्रार्थना करणे त्याचे परिणाम देवाच्या हातात सोडणे. कारण त्याचे नाव उच्च व गौरवी व्हावे हे मला वाटते. आपणासही देवाच्या नावाचे सामर्थ्य समजावे हे मला वाटते.

## *तुमच्या मार्गात दिवसांमध्ये प्रार्थना करा*

*पेत्र व योहान हे तिसऱ्या प्रहरी प्रार्थनेच्या वेळेस वरती मंदिरात जात होते. (दुपारी तीन वाजता) तेंव्हा जन्मापासून पांगळा असलेला कोणीएक माणूस होता; त्याला मंदिरात जाणाऱ्यांजवळ भीक मागण्यासाठी म्हणून दररोज उचलून मंदिराच्या सुंदर नांवाच्या दरवाजाजवळ ठेवीत असत. पेत्र व योहान हे मंदिरात जात आहेत असे पाहून त्याने भीक मागितली तेंव्हा पेत्र व योहान ह्यांनी त्याच्याकडे निरखून पाहिले; आणि पेत्र म्हणाला आम्हांकडे पाहा.*

*तेंव्हा त्यांच्यापासून काहीतरी मिळेल ह्या अपेक्षेने त्याने त्यांच्याकडे लक्ष लाविले. मग पेत्र म्हणाला, माझ्याजवळ सोनेरुपे (पैसे) कांही नाही; पण जे आहे ते तुला देतो, (नावाचा उपयोग) नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने चालूं लाग!*
*प्रेषित 3:1-6*

जर आम्ही लोकांचा न्याय करण्यापेक्षा लोकांसाठी जास्त प्रार्थना केल्या तर त्यांच्या व आपल्या जीवनातील अनेक बंधने नीखळून पडतील. तसे पाहाता त्यास व टीका करण्यापेक्षा प्रार्थना करण्यास कमी समय लागतो.

एक उदाहरण मी तुम्हांस देते.

समजा की एक तरुण पुरुष रस्त्याने चालला आहे. व तो जर अळखडला तर आम्ही समजतो की त्याला ठेच लागली असेल अथवा काही मादक पदार्थ, दारु घेतली असेल, तो घाणेरडा, विसकटलेला असल्याने आम्ही समजतो की तो बेघर असावा.

किती वेळेस आम्ही अशा व्यक्तींकडे पाहून स्वतःस म्हणतोः की “असे जीवन व्यर्थ वाया घालवणे किती लज्जास्पद आहे. काय भयानक जीवन जगतोय. मला विश्वास वाटत नाही की अशा प्रकारे दयनीय अवस्थेत लोक राहतात.”

ऐवढे बोलण्यापेक्षा त्या व्यक्तीसाठी पुढील प्रार्थना करण्यास कमी वेळ व शक्ती लागेल प्रार्थनेत म्हणाः बापा येशूच्या नावात मी या तरुणांसाठी प्रार्थना करते या निराशमय परिस्थितीतून त्याची सुटका कर. त्याच्या मार्गात एक कामगार पाठव की ज्याने तो ऐकेल व

वचन त्याला दिले जाईल. प्रभू मी तुझे आभार मानते की या घटकेपासून तु त्याच्या जीवनात कार्य करशील व तो हरवणार नाही.

प्रेषीत 3 अनुसार पेत्र व योहानप्रमाणे आमच्या मार्गांमध्ये, दिवसांत प्रार्थना करण्यास शिकले पाहिजे. आम्ही मानसीक दृष्ट्या प्रार्थना एक शारिरीक कृती आहे व ती चर्च अथवा घरीच व्हावी या विचारांपासून दूर (मुक्त) झाले पाहिजे. काही विचार व संकल्पना आहेत की देवासमोर आम्ही परिणामकारी, नटलेले, सुंदर असलो तर देव आमची प्रार्थना ऐकेल या विचारांवर आम्ही विजय मिळवला पाहिजे.

प्रार्थना म्हणजे केवळ प्रभुशी बोलणे, ते आम्ही प्रती दिवशी, संपूर्ण दिवसात करु शकतो. पेत्र व योहानाप्रमाणे त्या नावावर विश्वास ठेवून येशूच्या नावात प्रार्थना केली पाहिजे. येशूच्या रक्ताने त्याच्या नावाने प्रार्थना करणे हा आमचा वारसाहक्क आहे. (देवाच्या मुलां व मुलींप्रमाणे)

येशूच्या नावात जसे सामर्थ्य आहे तसेच येशूच्या रक्तात सामर्थ्य आहे.

## *रक्तामध्ये सामर्थ्य आहे*

*कारण बकऱ्यांचे व बैलांचे रक्त आणि कालवडीची राख ही अशुद्ध झालेल्यांवर शिंपडल्याने जर देहाची शुद्धि होईल इतके पवित्र करितात तर सार्वकालिक आत्म्याच्या योगे ज्याने निष्कलंक अशा स्वतःस देवाला अर्पण केले त्या*

*ख्रिस्ताचे रक्त आपली सद्सद्विवेकबुद्धि जिवंत देवाच्या सेवेसाठी निर्जीव कृत्यांपासून किती विशेषें करुन शुद्ध करील?*

*इब्री 9:13,14*

मला येशूचे रक्त व नाव याविषयी गाण्यासाठी फार आवडते. कारण माझा दृढ विश्वास आहे की प्रामाणिकपणे हे करताच दृष्ट आत्मे पळून जातात. त्यामुळे जर चमत्कारा करीता वातावरण तयार करावयाचे असेल तर मग प्रार्थना, गायण गाणे, उपदेश व येशूचे रक्त व नाव उंच करण्यास  सुरुवात केली पाहिजे.

**आमच्या आयुष्यातील पापे धुऊन काढण्याचे पुरेसे सामर्थ्य रक्तात आहे.**

विचार करा की आम्हांजवळ काय आहे. आम्हांकडे येशूचे रक्त व नाव आहे. येशूचे रक्त आम्हांस असे स्वच्छ करते की आम्ही कधी पापच केले नाही. (1 योहन 1:7)

स्वर्गात व पृथ्वीवर सर्व अधिकार येशूला देण्यात आले आहेत. व ते नाव आम्हाला देण्यात आले आहे. त्याच्या रक्ताने आम्ही धुतल्याने, आत्मविश्वासाने, येशूने आम्हांस जे वचनें दिली आहेत ती सांगितल्याप्रमाणे पुढे नेले पाहिजे, कारण त्याद्वारे त्यांच्या सामर्थ्याने येशूला सर्व सादर करतो.

सामर्थ्याहिन जीवनाद्वारे नीराश होऊ नका. तर उपलब्ध असणाऱ्या देवाच्या सामर्थ्याचा उपयोग व्यर्थपणे नव्हे तर, प्रार्थना व स्तुतीद्वारे उपयोग  करा.

# 4

# व्यर्थ नाव घेणे

*तुझा देव परमेश्वर ह्याचे नाव व्यर्थ घेऊ नको, कारण जो परमेश्वराचे नांव व्यर्थ घेईल त्याची तो गय करणार नाही.*
*निर्गम 20:7*

*ॲम्पलीफाईड पवित्र शास्त्राचे* भाषांतर हेच वचन असे लिहीते कीः *तुझा देव परमेश्वर ह्याचे नावाचा उपयोग पुन्हा पुन्हा व्यर्थपणे करु नको (म्हणजे हलकेपणाने कींवा गांभीर्य विरहीत, अपवित्रपणे खोट्या धड्यांनी)ः कारण जो त्याचे नांव व्यर्थपणे घेतो त्याची तो गय करणारच नाही.*

पुष्कळ वर्षापूर्वी, देवाचे नाव व्यर्थ घेणे या विषयासंबंधी मला प्रकटीकरण झाले.

त्यावेळेपर्यंत मला वाटत होते की प्रभूचे व्यर्थ नाव घेणे म्हणजे शापित शब्दांचा उपयोग त्यांबरोबर करणे अथवा इतर अपवित्र पद्धतीने नाव घेणे.

पण जेंव्हा मी हे वचन वाचले की, त्याचे नाव हलकेपणाने कींवा गांभीर्याशिवाय घेणे; तेंव्हा देवाने मला दाखवण्यास सुरुवात

केले की कीतीतरी वेळा आम्ही ख्रिस्ती विश्वासणारे केवळ अविश्वासणारे नाही, त्याच्या नावाचा दूर उपयोग करतो. “देव” या शब्दाचा उपयोग आम्ही अनेक, मार्गानी करतो. अनेक वेळा त्या नावातील सामर्थ्याने आम्ही प्रार्थना न करता, चंद्रावरील माणसासारखे वागतो. सहजरित्या अधांतरी प्रार्थना फेकतो. हेच ते व्यर्थ नाव व अपवित्रपणे नाव घेणे होय.

## *नकार आणि होकार यांचे मिश्रण*

*झऱ्याच्या एकाच छिद्रातून गोड पाणी वा कडू पाणी निघते काय?*

*याकोब 3:11*

देवाचे सामर्थ्य प्रभू येशूच्या नावात मुक्त न होण्याचे कारण विश्वासाने सांगते की आमच्या बोलण्यामध्ये आम्ही होकार व नकार यांचे मिश्रण करतो. व त्यामुळे परिणाम शून्य दिसतो.

जेंव्हा आम्हाला बंधनातून मुक्ती पाहायची असेल तर होकार व नकार या मिश्रणाने देवाचे नाव वापरून सामर्थ्याची अपेक्षा करु नका. या परिस्थिती विषयी प्रभू माझ्याशी बोलला (त्याच्या वाणीने नाही तर आत्म्यात) “काही लोक कुठेच जात नाहीत कारण एके दिवशी ते होकाराअर्थी असतात व दुसऱ्या दिवशी त्याच गोष्टीविषयी नकारार्थी असतात.”

जेंव्हा आम्ही चांगली कबूली व प्रार्थना करतो, तेंव्हा आमच्या वतीने देवदूत कार्य करण्यास जातात (स्तोत्र 103:20 आणि इब्री 1:14

पाहा) पण जेंव्हा आम्ही थकतो, व मनाने दमून जातो तेंव्हा आम्ही सर्व प्रकारच्या नकारार्थी गोष्टींचा उच्चार करतो. तेंव्हा जे प्रार्थनेने आम्ही रचले ते पाडत राहातो व पुन्हा पहिल्या स्थानी येऊन थांबतो.

जेंव्हा लोक असे काही बोलतात की “हे माझ्या देवा मी फारच थकलो,” ते प्रार्थना करीत नाहीत. ते देवाशी न बोलता फक्त ठरलेल्या शब्दांनी स्वतःच्या भावना व्यक्त करतात.

जर मी थकलो असेल तर हे माझ्या देवा – मी फार थकलो हे बोलणे योग्य होईल. कारण खरच त्या परिस्थितीत आमचे हृदय आम्ही पित्याकडे उंच करतो. पण बहुतेक वेळेस आम्ही हे करीत नाही तर अविचाराने त्याचे नाव आम्ही हलकेपणे व गांभीर्या वीरहीत घेतो. आम्ही वचनात वाचले की अशा लोकांची प्रभू गय करणार नाही. म्हणून काळजीपूर्वकरित्या त्याचा नावाचा उपयोग केला पाहिजे. जेथे-जेथे मी जाते लोक व विश्वासीजण म्हणतात की “हे प्रभू” किंवा “प्रिय देवा” पण ते देवाशी बोलतच नाहीत तर अशा प्रकारे बोलण्याची ही एक पद्धत प्रचलीत झाली तेच लोक असेही म्हणतात की.

“देवा किराणा मालाच्या कींमती या दिवसात खूपच वाढल्या आहेत.”

“प्रभू येथे फारच उन्हाळा आहे.”

“चांगल्या प्रभू मी फार भूकेला झालोय, मला वाटते की मी मरतोय.”

व हेच शब्द उपदेश, मध्यस्थी करतांना, आराधना पुढारी व मिशनरी ह्यांना पण बोलताना मी ऐकले आहे. हे इतक्या वेळा बोलले

जाते की त्यांना समजवण्यास संधी सुद्धा मिळत नाही. मला याचे दुःख वाटते कारण माझ्या मतानुसार ते स्वतःलाच दुःख करुन घेतात.

प्रभूने मला दाखविले की पुष्कळ ख्रिस्तीजनांनी या स्त्रोतात स्वतःला सुधरविले पाहिजे. त्यामुळे आम्ही आणखी त्या नावाचा आदर करु.

## *नामाचा आदर*

*म्हणून न हालवितां येणारें राज्य आपल्याला मिळत असल्याकारणाने आपण उपकार मानू; तेणेकरुन देवाला संतोषकारक होईल अशी त्याची सेवा, आदर व भय धरुन करु; इब्री 12:28*

ज्या कार्यक्रमात, चित्रपटांमध्ये येशूचे नाव व्यर्थ घेण्यात येते ते मी कधीच पाहाणार नाही. जरी माझ्या कुंटूबाला मला ते पाहावसे वाटले तरी जर येशूचे नाव व्यर्थपणे घेतले जात असेल तर ते पाहाण्याची आम्हाला मुळीच गरज नाही.

का?

कारण तो एक आदर व भय आहे. मी प्रभूवर खूप प्रीति करते व जर कोणी करमणूक म्हणून त्या नावाचा व्यर्थ उपयोग करीत असेल तर ते माझ्यासाठी फार विचित्र असे आहे.

मी खरेपणाने सांगते की जर त्या नावाचे सामर्थ्य गरजेप्रणाने आमच्या जीवनात असावे असे आम्हांस वाटते तर सर्व वेळ त्याच्या नामाचा आदर केला पाहिजे.

जुन्या करारामध्ये लोक देवाच्या नावाचा आदर कसा करीत असत याची बहुतेक लोकांना माहिती नाही. ते इतका आदर करीत की त्याचे नाव उच्चाराने देखील त्यांना भयावह वाटे. पुष्कळ वेळा नाव घेण्याऐवजी ते म्हणत “हे प्रभू” कारण त्यांना त्या नावातले सामर्थ्य माहित होते.

दावीद जेंव्हा पलिष्टी बलाढ्य योद्धा, (इस्त्रायलचा शत्रू) गल्याथाबरोबर युद्ध करण्यास गेला तेंव्हा, जुन्या करारात मध्ये गल्याथाने दावीदाला आपल्या देवांची नावे घेऊन त्याला शिवाशाप देत धमकावले की.... “असा जवळ ये म्हणजे तुझे मांस आकाशातील पक्ष्यांस व वनपशूस देतो.” (1 शमु. 17:43,44)

दावीद संकटात असता त्याने शत्रूच्या धमकीला प्रतिउत्तर दिले. *...तू तलवार, भाला व बरची घेऊन मजवर चढून आला आहेस, पण इस्त्रायली सैन्यांचा देवाला तू तुच्छ लेखिले आहेस; त्या सेनाधीश परमेश्वराच्या नामाने मी तुजकडे आलो आहे!)* (वचन 45)

नंतर दावीद म्हणाला: “आज परमेश्वर तुला (तुझे शिर) माझ्या हाती देईल.” (वचन 46)

या युद्धसामग्री धारीत माहाकाला मारण्याकरिता दावादीदाने केवळ गोफण, गोटे व देवाचे नाव यांचा उपयोग केला. व त्याच्या शत्रूला हरवण्याकरिता तेवढाच साठा त्याला उपयोगी पडला. जेंव्हा आमचा आत्मीक शत्रू आम्हांवर हल्ला करतो तेंव्हा आम्ही सुद्धा देवाने आम्हाला दिलेले आत्मीक शस्त्र, येशूचे नाव याचा वापर केला पाहिजे, जे आम्ही आत्ताच पाहिले. येशूचे नाव अंधाराची सत्ता मोडून टाकते.

## *समस्यांमागील आत्म्यांशी झगडा*

*कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्यांबरोबर, सध्यांच्या काळोखातील जगाच्या अधिपतीबरोबर आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे.*

*इफिस 6:12*

एखादी व्यक्ती जेव्हा आपल्याला राग आणते किंवा निराश करते, तेव्हा त्या व्यक्तीचा न्याय करून किंवा तिच्यावर टीका करून काही उपयोग होत नाही. त्या व्यक्तीच्या मागे जो आत्मा आहे त्याचा आपण प्रभूच्या नावात योग्य तो समाचार घेण्याची गरज आहे.

मी गोल्फच्या मैदानावर असते, तेव्हा कधीकधी असे प्रसंग येतात की, सतत शिव्याशाप देणारे लोक माझ्या आजूबाजूला असतात. अशा वेळी तेथून बाजूला जाऊन, "शिव्याशाप देणाऱ्या दुष्ट आत्म्या, येशूच्या नावात मी तुझ्यावर अधिकार गाजवते. तू तुझे तोंड बंद कर. दिवसभर मी ते शिव्याशाप ऐकत बसणार नाही," असे म्हणायला शिकले आहे.

इतर प्रसंगी मी लोकांना टीका करताना, कुरकुर करताना, इतरांना दोष देताना ऐकते - आणि त्यांच्यासोबत मी पूर्ण दिवस घालवावा अशी अपेक्षा केली जाते! पण याही प्रसंगी मी बाजूला जाते आणि म्हणते, "देवपित्या, येशूच्या नावात मी त्या छिद्रान्वेशी आत्म्यावर अधिकार गाजवते. त्याची कुरकुर मी दिवसभर ऐकत राहणार नाही." (पाहा मत्तय.18:18.)

कधीकधी लोक मला विचारतात, "तुम्हांला नेहमीच ताबडतोब उत्तरे किंवा परिणाम मिळतात का?"

ह्याचे उत्तर नाही असे आहे. लोकांना मुक्त इच्छा आहे आणि ते माझ्या प्रार्थनेची किंवा माझ्या कबुलीची पायमल्ली करू शकतात. पण इतर कोणतीही कृती करण्यापूर्वी मी स्वतःच्या जीवनात प्रार्थना करायला शिकत आहे. प्रार्थना हा समस्या हाताळण्याचा सकारात्मक, स्फूर्तिदायक मार्ग आहे. एखाद्या व्यक्तीला थेट काही सांगण्याची आवश्यकता असेल, तर मी तसे करीन; पण अशा प्रकारच्या परिस्थितींत मला नेहमी पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनावर अवलंबून राहायचे आहे.

मुद्दा हा आहे की, रोज आपण ज्या लोकांच्या किंवा परिस्थितींच्या संपर्कात येतो त्यांच्यासाठी आपण अधिक प्रार्थनाशील राहण्याची गरज आहे. येशूच्या नावात सामर्थ्य आहे हे आपण लक्षात ठेवण्याची गरज आहे.

## *हे नाव म्हणजे थट्टा नाही!*

*तसेच अमंगळपण बाष्कळ (मूर्खपणाच्या व भ्रष्ट) गोष्टी व टवाळी ह्यांचाही उच्चार न होवो, ती उचित नाहीत; तर त्यापेक्षा देवाची उपकारस्तुती होवो.* *इफिस. 5:4*

एक गोष्ट की मुर्खपणे त्याचा नावाचा वापर न करणेसंबंधी प्रभुने मला शिकविली.

एके दिवशी संध्याकाळच्या भोजनासाठी माझा मुलगा घरी आला मी सुंदर जेवण टेबलावर मांडून ठेवले. पण तो जेवणाऐवजी सातत्याने बोलतच राहीला की त्या गोष्टींशी माझा काहीच संबंध नव्हता. जेव्हा मी पाहिले की हा पुन्हा जाण्याच्या घाईत नाही. तेंव्हा विनोदाने मी म्हणाले “येशूच्या नावात बाहेर नीघ!”

जेंव्हा मी हे बोलले त्याच घटकेस मला जडपणे मी दोषी असल्याचे जाणवले कारण प्रभू याबाबत मला शिकवीत होता. मी अशा प्रकारे लोक बोलतांना ऐकले पण आम्ही येशूच्यानावाने विनोद न करण्याची काळजी घेतली पाहिजे.

एकदा मी एका सामर्थ्ययुक्त ख्रिस्ती प्रार्थना करणाऱ्या सेवकाच्या घरी दुपारच्या भोजनास गेले जी व्यक्ती ती त्याने देवाच्या वचनाची सेवा करीत असे. त्या व्यक्तीने पाच वेळेस येशूचे नाव (हलक्या, मुर्खपणे) व्यर्थपणे घेतले. तसेच अनेक विश्‍वासूजन कळत न कळत जे करु नये ते करीत असतात.

जेंव्हा येशूच्या नावाचा वापर तुम्ही करता तेंव्हा प्रामाणिकपणे ते तुम्ही करीत आहात याची खात्री करुन घ्या. जर अशी चूक आपल्या वाईट सवयींमुळे आम्ही केली व अयोग्य प्रकारे त्याचे नाव घेतले तर तेथेच थांबा व पश्‍चताप करा. देवाला त्याबद्दल क्षमा मागा. जेंव्हा अयोग्य प्रकारे आम्ही त्याचे नाव वापरतो तेंव्हा आम्ही स्वतःलाच दुःख करुन घेतो. गरजेप्रमाणे जर देवाचे सामर्थ्य आम्हांस हवे असेल तर सतत त्या नामाचा आदर केला पाहिजे.

जेंव्हा आम्ही नाव घेतो तेंव्हा लगेच सामर्थ्य आम्हांस देण्यात येते – जे सामर्थ्य सैतानविरुद्ध, त्याच्या दूतांच्याविरुद्ध, कार्य करुन आम्हास स्वतःला व इतरांना आर्शीवाद देण्यास साह्य करते.

थेंब थेंब सामर्थ्य नव्हे तर महाप्रलयी सामर्थ्याविषयी मी बोलत आहे. ज्याद्वारे हा देवाचा आशीर्वाद आम्हामध्ये येतो. त्याची मुख्य गुरुकिल्ली हीच आहे की “येशू! हे गौरवयुक्त नाव आदर व सन्मानाने घ्यावे.”

# 5

# नावाचा आदर व सन्मान

*मी थोर राजा आहे व राष्ट्रांत माझ्या नामाची भीति धरितात, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो.*

*मलाखी 1:14*

या क्षणापर्यंत येता आपणास समजले असेल की येशूचे नाव सर्व सामान्य नावांपेक्षा सर्वश्रेष्ठ आहे. नावात सामर्थ्य आहे, ह्या वचनांमध्ये प्रभू स्वतः म्हणतो माझ्या नावाची आदरयुक्त भीती बाळगा "भीती" या शब्दाचा अर्थ म्हणजे प्रभूवरील विश्वास, आदर, प्रिती, आज्ञापालन नितीसूत्रें 1:17 सांगते. परमेश्वराचे भय हे ज्ञानाचा प्रारंभ होय, पण मूर्ख लोक ज्ञान व शिक्षण तुच्छ मानितात.

जर सत्य आपणांस माहिती करुन घ्यावयाचे असेल तर माझ्या मतानुसार पुष्कळ ख्रिस्ती लोक पुष्कळ आध्यात्मीक गोष्टींचा आदर करत नाहीत.

जेंव्हा आम्ही शिकलो की देव आमचा मित्र आहे. तेंव्हा आमचे एक जवळचे नाते त्याच्याशी जुळते.

काही दिवसापूर्वी देव माझ्याशी बोलला की आम्ही काळजीपूर्वक विचार केला पाहिजे की तो काही आमच्या हातातील कोंब नाही पण तो महान व आश्चर्यकारक प्रभू आहे.

## *आदर आज्ञा पाळण्यास चेतवितो*

*मुलांनो प्रभूमध्ये तुम्ही आपल्या आई बापांच्या आज्ञेत राहा, कारण हे योग्य आहे.*

*आपला बाप व आपली आई ह्यांचा मान राख... अभिवचन असलेली हीच पहिली आज्ञा आहे.*

*इफिस 6:1, 2*

माझा विश्वास आहे की जर आम्ही आदर करतो तर आज्ञा पाळणे, कारण आदर – आज्ञा पाळण्यास चेतावणी देते.

जेव्हा लेकरे आई–वडिलांचा आदर करतात तेंव्हा त्यांच्याशी ते व्यर्थ बंडखोरपणे वागत नाहीत.

पुष्कळ मुले आपल्या आई–वडिलांना मात देत नाही कारण मी विश्वासाने सांगते की त्यांचे आईवडिल आत्मकी गोष्टींना आध्यात्मीक नेत्यांना व त्यांच्यावर असणाऱ्या अधिकाऱ्यांचा ते मान करीत नाहीत. व हेच गुण पाळकांकडून मुले घेतात व मग ते बालकांशी वादीवाद करणे, उलट बोलणे, बंडखोरपणे वागणे ह्या गोष्टी करीत राहतात.

जर आमच्या अधिकाऱ्यांचा आम्ही मान करीत नाही तर मुलांना आम्ही हे शिकवतो की तुम्हीही आदर, मान देऊ नका.

दुकाने व इतर सार्वजनिक ठिकाणी आम्ही सर्वसाधारणपणे पाहतो की दोन वर्षाचे मुल आपल्या आईला क्रोधाच्या झटक्याने मारत आहे, लाथा झाडत आहे. जर आम्ही त्याची आताच काळजी घेतली नाही तर अशाच पद्धतीने हे मुल आमचा देवाचा अनादर करत राहील. दुसऱ्या शब्दांत देवाला व आम्हांला, तसेच इतर जे सर्व अधिकारी आहेत त्यांनाही मान देणार नाहीत.

लक्षात घ्या की सैतान हेच करु पाहात आहेत. जगात तो अनादर व अपमान आणतो, की ज्यामुळे तो मनुष्य चर्चमधून बाहेर पडेल, कारण त्याला माहित आहे की जेंव्हा आम्ही आदर करीत नाही तेंव्हा आमच्याने आज्ञापालनही होत नाही. व आज्ञा न पाळल्याने आपल्या जीवनात देवाचे सामर्थ्य कार्य करीत नाही. त्यामुळे प्रसिद्धि पासून आपण दूर राहिले पाहिजे.

## *अतिपरिचय अनादाराला जन्म देते*

*नाखोनाच्या खळ्यापाशीं ते आले तेंव्हा बैलाने ठोकर खाल्ली म्हणून उज्जाने कोश हात लांब करुन धरिला.*

*तेंव्हा परमेश्वराचा कोप उज्जावर भडकला; त्याच्या ह्या चुकीमुळे परमेश्वराने त्यांस ताडन केले व तो तेथल्या तेथे देवाच्या कोशापाशी गतप्राण झाला.*

*2 शमु 6:6,7*

जुन्या करारातील वरील परिच्छेदात आम्ही वाचतो की दावीद व त्याची माणसे कराराचा कोश पुन्हा बेथल येथे घेऊन जात असता

एका जागी बैलाने ठोकर खाली व कोश पडू लागला, व उज्जीया तरुण पुरुष जो गाडी हाकीत होता त्याने कोश हात लांब करुन धरीला...तेंव्हा परमेश्वराचा कोप भडकला त्याच्या ह्या अनादारामुळे परमेश्वराने त्यांस ताडन केले. (वचन 7) तो तेथल्या तेथे कोशापाशी गतप्राण झाला. (गणना 3 आणि 4 मध्ये कोश कोणी व कसा वाहावा यासंबंधी मोशेला विशेष सूचना देण्यात आल्या होत्या)

वचन 8 सांगते की परमेश्वराने उज्जाला तडाका दिला म्हणून दावीद फार खिन्न झाला त्याला हे समजले नाही की केवळ उज्जीयाने हात लांब करुन कोशाला स्पर्श केल्याने तो का मेला.

या अगोदर 1 शमु 7, मध्ये आम्ही वाचतो की प्रथमच पलिष्टी लोकांनी जेंव्हा इस्त्राएल लोकांना कोश परत केला, तेंव्हा कित्येक वर्षे तो उज्जीयाचे वडील अबीनादाबाच्या घरी ठेवण्यात आला होता.

मला वाटते की पुष्कळ वर्षे कोश त्यांच्या घरी राहिल्यामुळे उज्जीयाला ती एक सर्वसाधारण गोष्ट वाटत असावी, म्हणून त्याने कोशाचा उचीत आदर केला नाही. म्हणून त्याने कसलेच भय न धरता त्याने स्पर्श केला. त्याचा कोशाबरोबर असणाऱ्या दाट परिचयामुळे अनादर निर्माण झाला व त्याची किंमत त्याचे जीवन त्याला गमवावे लागले.

## *दाट परिचय सामर्थाला मर्यादित ठेवतो*

*तेंव्हा येशू त्यांना म्हणाला संदेष्ट्याचा सन्मान होत नाही असे नाही, मात्र त्याच्या देशात, त्याच्या आप्तेष्टांत*

*अथवा त्याच्या घरच्या मंडळीत त्याचा सन्मान होत नसतो.*

*थोड्याशाच रोग्यांवर हात ठेवून त्याने त्यांस बरे केले, ह्याशिवाय दुसरे कोणतेहि महत्कृत्य त्याला तेथे करता आले नाही.*

*त्यांच्या अविश्वासामुळे त्याला आश्चर्य वाटले...*

*मार्क 6:4-6*

कोणत्याहि गोष्टीशी दाट परिचय करण्यापासून आम्ही सांभाळले पाहिजे. एकदा दाट परिचय झाला की जो आदर आम्ही करायला पाहिजे तो करु शकत नाही. लोकांबरोबरही दाट परिचय हेही असेच काम करते.

मला माहिती आहे की पुष्कळ लोकांना हे कळत नाही की आध्यात्मीक नेते त्यांच्या लोकांशी "दाट परिचय" ठेवत नाहीत. कारण पुष्कळवेळा जर त्यांचा अशा नेत्यांशी दाट परिचय झाला तर गरजेनुसार ते त्यांच्या हृदयाकडे लक्ष लावीत नाहीत. मनुष्याच्या नैसर्गिक स्वभावानुसार ज्या गोष्टी सहज उपलब्ध होतात त्याची किंमत माणसांना नसते.

वरील मार्क 6 या अध्यायात येशू आपल्या नासरेथ गावात गेला जेंव्हा तो सभास्थानात शिकवित होता, तेंव्हा पुष्कळ लोक अडखळते. कारण तो मरीयेचा पुत्र आहे हे ते ओळखत होते. तसेच येशूच्या बहिण, भावांना ते ओळखत होते. या दाट परिचयामुळे ते

त्याचा आदर व सन्मान करु शकले नाहीत. त्याचा परिणाम केवळ थोडक्यांना आरोग्य मिळाले कारण सामर्थ्य मर्यादित राहिले.

कधीकधी पाळक त्याच्या मंडळीतील व्यक्तीकडील बंधनातून मुक्तता मिळवण्यासाठी प्रार्थना करतात. नंतर एखादा सुवार्तिक मंडळीला भेट देतो व त्याच व्यक्तीसाठी प्रार्थना करता ती व्यक्ती तात्काळ बरी होते.

हे का होते? काय सुवार्तिक पाळकांपेक्षा जास्त अभीषिक्त व सामर्थ्यमय आहे?

नाही कारण ती आजारी व्यक्ती पाळकापेक्षा सुवार्तीकाला वेगळेपणाने पाहाते. प्रत्येक आठवड्याला त्या पाळकाला पाहिल्यामुळे “चांगले जुने पाळक” असेच संबोधतात, सर्वजन त्यांच्यावर प्रीती करतात, तो मोठा माणूस आहे असे पाहातात पण दुसऱ्या व्यक्तीवर जो विश्वास ते दाखवतात तो पाळकाला दाखवत नाहीत.

कारण त्याला मनुष्य या नात्याने ते पाहात असतात, किंवा त्याला त्यांच्या मुलाबाळांसहीत पाहात असतात. त्यामुळे त्यांच्या सारखाच तो एक “सर्वसाधारण माणूस” आहे हे विसरु शकत नाहीत. पण मंडळीला भेट देणारा सुवार्तीक ही असाच आहे हे ते पाहू शकत नाहीत.

## *दाट परिचय आदर कमी करतो*

*जो सुतार, जो मरीयेचा मुलगा आणि याकोब, योसे,*
*यहूदा व शिमोन ह्यांचा जो भाऊ तोच हा आहे ना?*

*आणि ह्याच्या बहिणी येथे आपल्याबरोबर आहेत ना?*
*असे ते त्याच्याविषयी अडखळले.*

*मार्क 6:3*

जेंव्हा एखाद्या व्यक्तीचे तारण होते व देवाचे पाचारण त्याला होते तेंव्हा त्यांचे कुंटूबीय व नातेवाईक त्या पाचरणाचा स्वीकार करीत नाहीत.

तुम्हाला त्याचे कारण माहिती आहे का? कारण त्याचा व्यक्तीशी दाट परिचय असल्यामुळे त्याला किती मान द्यावा हे त्यांना कळते. जे या वचनात वाचले ते कोणाबरोबरही घडू शकते येशूबरोबर सुद्धा (योहान 7:5) सांगते. कारण त्याचे भाऊहि त्याच्यावर विश्वास ठेवीत नव्हते.

माझेही नातेवाईक अद्याप माझ्या सेवेला इतर लोकांसारखा मान देत नाहीत. काहीजन मला म्हणतात “आत तू एक मोठी व्यक्ती आहेस पण आम्हाला तू काय होतीस....”

काही लोक आम्हांला आमच्या भूतकाळाच्या विसर पडू देत नाहीत. पण पवित्र शास्त्र सांगते. म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ति आहे, जुने तें होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे. (2 करिंथ 5:17)

येशूच्या नावाचा आम्हास असाही दाट परिचय नको की ज्यामुळे अविचाराने ना समजपणे त्याचे नाव हाताळू कारण नाव घेण्यापेक्षाही त्याच्यामध्ये जास्त सामर्थ्य आहे.

तुमच्या विषयी मला माहिती नाही पण जेंव्हा मी "येशू" म्हणते तेंव्हा त्या नावातला असणारा अभिषेक मला जाणवतो. व माझ्या सभांमध्ये लोकांना तारण, आरोग्य मिळून ते पवित्र आत्माने भरतात. अशा प्रकारचे परिणाम सेवेतील लोकांकरिता मर्यादित नाहीत. त्यामुळे माझी हीच इच्छा आहे की प्रत्येक विश्वासनाऱ्याने या गौरवी नावाचा सन्मान व आदर करावा. जेंव्हा आम्ही हे करतो तेंव्हा त्यातील सामर्थ्याकरिता आमचे हृदय उघडते व कोणतीही परिस्थिती हाताळण्याचे, चमत्काराचे सामर्थ्य आम्हामध्ये कार्य करते.

# 6
# नाव आणि नाते

*आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रगट होऊन त्याने मरण आणि तेंहि वधस्तंभावरचे मरण सोसले; येथपर्यंत आज्ञापालन करुन त्याने स्वतःला लीन केले.*

*ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले; आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नांव ते त्याला दिले.*

*ह्यात हेतु हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावांने टेकला जावा.*

*आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभु आहे असे कबूल करावे.*

*फिलिप्पै 2:8-11*

ज्या परिच्छेदात लिहिलेले सामर्थ्‍र्ययुक्त नाव येशूला कसे मिळाले, की जे नाम प्रभु, तारणारा, शब्द (योहान 1:1), देवाचा कोकरा (योहान 1:29) जीवनाची भाकर (योहान 6:35) राज्यांचा राजा व प्रभुंचा प्रभु (प्रकटी 17:14) या नावांशी साम्य राखते?

त्याच्या अति आज्ञापालनामुळे त्याला ही सम नावे मिळाली. आज्ञापालन याविषयी आम्ही शिकलो पण त्याचा आणखी एक पैलू याठिकाणी आपण शिकू.

## *आज्ञापालन आणि नाते*

*अशी जी चित्तवृत्ति ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीहि असो; तो देवाच्या स्वरुपाचा असूनहि देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही.*

*तर त्याने स्वतःला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरुपाचें होऊन दासाचे स्वरुप धारण केले.*

*आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रगट होऊन त्याने मरण, आणि तेहि वधस्तंभावरचे मरण सोसले; येथपर्यंत आज्ञापालन करुन त्याने स्वतःला लीन केले.*

*फिलिप्पै 2:5-7*

या ठिकाणी आम्ही शिकतो की त्याच्या आज्ञापालनच्या कृती अगोदर (जे फिलिप्पै 2:8-11 या अध्यायाच्या सुरुवातीला स्पष्ट केले आहे.) त्याचे पित्याशी नीतीपूर्व नाते होते.

जर त्याच्या नावाद्वारे आमच्या जीवनात सामर्थ्ययुक्त परिणाम समोर असतील तर जसे त्याचे स्वर्गातील पित्याशी नाते होते तसे आमचे येशूबरोबर नाते असणे आवश्यक आहे.

आमचा वेळ एखाद्या व्यक्तीला दिल्याने नाते जोडले जातात. म्हणून येशू बरोबर जवळचे नाते ठेवण्यासाठी दैनंदिन त्याची संगती असणे ही आवश्यक आहे. याचा अर्थ म्हणजे दररोज त्याच्याबरोबर बोलणे, दररोज पवित्र वाचन वाचणे, व त्याला आमच्या जीवनात स्थान देणे होय.

जबाबदारीने – जी जबाबदारी विवाहाच्या वेळी आपण घेतो त्याप्रमाणे वागल्याशिवाय खरे नाते त्याच्याशी जोडणे शक्य नाही.

## *नावाच्या वापराकरिता विवाहबद्ध व्हा!*

*वधू ज्याची आहे तोच वर आहे...*

*योहान 3:29*

पवित्र शास्त्रामध्ये येशूला वर व मंडळीला (चर्चला) वधू असे संबोधले आहे. वर व वधू म्हणजे लग्न, विवाह होय हे विवाहबंधन पती व पत्नीमध्ये शिकाऊ नाते प्रस्थापित करते.

जेंव्हा माझा विवाह देव मेयेर यांच्याशी झाला तेंव्हा मी त्यांचे नाव घेतले. त्यामुळे “देव मेयेर” ज्याचे प्रतिनिधीत्व करतात त्यावर माझा पूर्ण अधिकार आहे.

पण विवाहापूर्वी मला काहीच अधिकार नव्हता. त्याच्याकडे नवी गाडी होती. व ज्याक्षणी आम्ही विवाहीत झालो तेंव्हा ती गाडीपण माझीच झाली.

विवाहापूर्वी माझ्यावर काही कर्ज होते लग्नानंतर ते कर्ज देव यांचे पण झाले.

जे काही आमचे वैयक्तिक होते ते विवाहानंतर आमच्या दोघांचे झाले.

पण त्यापूर्वी असे नव्हते "देव मेयेर" हे नाव व ते जे प्रतिनिधीत्व करते ते लग्न होईपर्यंत मला मिळाले नव्हते.

येशूबरोबर सुद्धा हेच आहे; जोपर्यंत आम्ही त्याच्याशी विवाह करीत नाही तोपर्यंत त्याचे नाव व बहुमान आम्हांला मिळणार नाही.

समस्या ही आहे की पुष्कळ ख्रिस्तीजन केवळ येशूला भेटण्याचा संकेत देत असतात. व स्वतःच्या इच्छेने स्वतंत्रपणे स्वतःचे जीवन जगत असतात. आपले सर्वस्व येशूला न देता जीवनातील काही क्षेत्र स्वतःला ठेवतात.

**देवाशी पुर्ण जबाबदारीने ते वागत नाहीत**

**हे येशू मी त्रासात आहे! तर मला संकेत दे!**

**हे येशू मला थोडे पैसे पाहिजेत! मला संकेत दे!**

त्या नावाचा उपयोग आरोग्य व पैसा, बंधनातून सुटका, व जे काहि त्यांना पाहिजे त्याकरिता ते करतात. पण सर्वस्वी येशूचे होऊ इच्छित नाहीत.

येशू अशा अनियमीत संबंधाना मान देत नाही. त्याला आमच्याशी कायमचे संबंध ठेवायचे आहेत. आमच्या बोटात आंगठी घालून आमच्याशी करार करुन तो विवाह करु इच्छितो. तो आमचा वर एकमेव प्रभू होऊ इच्छितो. (यशया 54:5)

पण आम्ही असे संबंध प्रभूशी ठेऊ शकत नाही. पण त्या नावाचा उपयोग करायचा आहे तर **ते लक्षात ठेवले पाहिजे की येशूशी विवाह केल्याशिवाय त्याच्या नावाचा उपयोग करता येत नाही.**

जसे मी माझ्या पतीशी विवाहबद्ध होईपर्यंत त्याच्या नावाचा उपयोग करु शकत नव्हते. त्याच्या खात्यामधून मी पैसे काढू शकत नव्हते. तोपर्यंत आम्ही केवळ एकमेकांना संकेत देत होतो. पण ज्या क्षणी आमचा विवाह झाला मला त्यांचे सर्व काही मिळाले. कारण जे त्यांचे होते ते माझे झाले.

देवाने मला पुष्कळ दिवसापूर्वी सांगितले (वाणीने नव्हे तर आत्माने) “जर तु तुझे सर्वस्व मला देशील तर मी पण माझे जे आहे ते तुला देईन, व जे माझे आहे ते तुझे होईल, पण तुला माझेच व्हावे लागेल.”

दुसऱ्या शब्दात आमचे संपूर्ण लक्ष त्याकडे असावे, पुर्णपणे त्याच्यामागे चालावे व आमचे सर्वस्व त्याला द्यावे हे तो अपेक्षीत करतो.

का?

त्याचे सामर्थ्य आम्ही त्याचे पूर्णपणे झाल्याने व त्यांच्याशी असलेल्या नाताने आम्हांत येते.

## *सर्वस्व अर्पणे सामर्थ्य येते*

*परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना*

*म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.*

*योहान 1:12*

माझ्या जीवनात मला सातत्याने वाटते की मी देवाच्या मालकीची आहे.

त्याचा अर्थ काय?

मी माझ्या स्वतःची नाही, त्यामुळे मला जे वाटते ते मी करु शकत नाही, पैसे खर्चने इतरांचे आदरातिथ्य करणे जसे मला वाटते तसे मी करु शकत नाही.

जे मला करावयाचे आहे ते करण्यास देव परवानगी देतो व प्रत्येक लहान सहान गोष्ट त्याला विचारण्यापेक्षा त्याच्याच इच्छेने मी करते.

आमच्या दैनंदिन जीवनातील गोष्टी करण्याकरिता पवित्र आत्मा आम्हांस चालवतो असा मी विश्वास धरते. तसे इतर सर्वसाधारण गोष्टीतही तो आमचे साह्य करतो. पण जेंव्हा एखादी चूकीची गोष्ट मी करीत आहे असा संकेत मला मिळतो तेंव्हा मी ताबडतोब थांबते.

मी ते का करते कारण देवाची उपस्थीती माझ्यापासून हरवू नये अशी आदरयुक्त भीती मी बाळगते.

होय मला भय वाटते पण योग्य मार्गाने, देवाचे भय नाही तर जे हजारो लोक माझ्यासमोर देवाचा शब्द व सामर्थ्य आणण्याची वाट पाहतात–व तेथे जर काही घडले नाही तर मी देवाची उपस्थीती व अभिषेक माझ्या जीवनातून हरवण्याची ती भीती आहे!

ते भयावह आहे. व ते असावे. कारण त्यामुळे मी आज्ञापालन व प्रार्थनेत राहाते. व जेंव्हा दूरदर्शनवर येशूचे नाव व्यर्थपणे घेण्यात येते तेंव्हा ते बंद करण्यास साह्य मिळते.

देवाशी मी करार केलाय की मी त्याची आहे व त्याचा परिणाम जेंव्हा मी वेळोवेळी प्रार्थना करते तेंव्हा त्याच्या सामर्थ्याचा अनुभव घेते.

हे आश्चर्यकारक आहे की कीततरी ख्रिस्तीजन देवाशी करार करीत नाहीत व त्यांच्या जीवनात सामर्थ्यांना अनुभव येत नाही. ते तारलेले आहेत जेंव्हा ते मृत्यु पावतील तेंव्हा ते स्वर्गात ही जातील.

पण पृथ्वीवर ते सामर्थ्यहीन जीवन जगत आहेत.

हे त्यांना समजत नाही की आमच्या सर्वस्व सर्मपणाने सामर्थ्य येते. ते देवाशी करार करीत नाहीत कारण जबाबदारी/करार हा शब्द त्यांना अस्वस्थ करतो. त्यांना वाटते त्यांना काहीतरी सोडून द्यावे लागेल. व त्यांना खरोखर, लाभ होईल. (मत्तय 19:29)

तुम्ही परीपूर्ण असावे हे देव अपेक्षीत करीत नाही. जेंव्हा तुम्ही त्याचे होता तेंव्हा तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवा की तो तुम्हाला करार टिकवण्यास साह्य करतो.

जे तुम्हाला करता येते ते करा व जे तुम्हाला करता येत नाही ते करण्यास तो तुम्हांला साह्य करेल.

देवाशी करार करणे म्हणजे दोन बाजूचा करार होय. आम्ही सर्व जबाबदारी त्याला देतो व तो सदैव आम्हा बरोबर रहाण्याचे वचन देतो. (मत्तय 28:20)

तो कसा आम्हांबरोबर आहे?

त्याच्या नावाने तो आम्हांबरोबर आहे हे कधीही विसरु नका. प्रत्येक एकांत बोलण्यात तो आहे. जेंव्हा आम्हांला मदत पाहिजे तेंव्हा आम्हाला तो मदत करतो आणि जे आमच्या जीवनात तो योजतो ते तो पूर्ण करतो.

देवाच्या अद्भूत नावात सामर्थ्य आहे. त्या सामर्थ्याचा उपयोग आम्हांस मदत करण्यास, आरोग्य देण्यास, अमुलाग्र विपुलतेने आशीर्वाद देण्यास देण्यास देव करतो.

मी प्रार्थना करते की या क्षणापासून आपण शपथ घ्या की तुम्ही जबाबदारीने वागून येशूच्या नावाच्या सामर्थ्यात पुढे जाल. येशू–**सर्व नावापेक्षा श्रेष्ठ नाव!**

# सारांश

*....तुम्ही हे कोणत्या सामर्थ्याने किंवा कोणत्या नावाने केले?*

*तेंव्हा पेत्र....त्यांना म्हणाला तर तुम्हा सर्वांना व सर्व इस्त्राएल लोकांना हे कळावे की ज्याला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले; ज्याला देवाने मेलेल्यांमधून उठविले, त्या नासोरी येशू ख्रिस्ताच्या नांवाने हा मनुष्य बरा होऊन तुमच्यापुढे उभा राहिला आहे.*

*प्रेषित 4:7,8,10*

येशूचा नामाच्या सामर्थ्याला पुरे असे आपण म्हणू शकत नाही. स्वर्गात व पृथ्वीवर त्याच्या नावाच्या सामर्थ्यापेक्षा काहीच नाही. व कोणत्याही परिस्थितीत त्याचे नाव वापरण्याचे अधिकार विश्वासनाऱ्यांना देण्यात आला आहे.

मला वाटते की जेंव्हा देवाची लेकरे इतर ख्रिस्तीजनांसारखी प्रार्थना करतात पण त्याचे परिणाम त्यांच्या जीवनात सामर्थ्य नसल्याने काहीच दिसत नाहीत, यापेक्षा दुर्भाग्य कोणतेच नाही.

**जगाचे अशक्तपण आपला वारसा नाही.**

आम्हांसाठी येशू पृथ्वीवर येऊन वधस्तंभावर मेला, तीसऱ्या दिवशी पुन्हा उठला, आम्हाला अशक्त वा हरलेले असे ठेवण्यास तो आला नाही. आम्हाला वारसा देण्याकरता ह्या सर्व गोष्टीतून तो गेला–व आम्हांस सर्व परिस्थितीवर येशूच्या नावात सत्ता गाजवण्यास सामर्थ्य दिले.

या पुस्तकात देवाने मला दाखवलेले सामर्थ्य मिळवण्याच्या कील्ल्या दिल्या आहेत. लक्षात घ्या, येशूच्या नावातील विश्वासाने तसेच त्याच्या नावाने विश्वासाने प्रार्थना केल्याने त्याच्या नावाला दिलेला आदर, सन्मान, व त्याच्याबरोबरीत नात्याने आम्हांस सामर्थ्य मिळते.

मला विश्वास वाटतो की या तत्त्वांचा वापर आपल्या जिवनात करताच चांगल्या गोष्टीचा अनुभव आपण घ्याल.

सर्व गरजा भागवण्याकरिता तुम्हाजवळ सामर्थ्य आहे. व त्या गरजांविरुद्ध जेंव्हा येशूच्या नावाचा अधिकाराने तुम्ही उपयोग कराल, तेंव्हा येशूच्या नावाचा अधिकाराने तुम्ही उपयोग कराल, तेंव्हा येशूच्या नावात आपण बदल पाहाल. **सर्व श्रेष्ठ नाव येशू.**

# देवाशी वैयक्तिक नाते जोडण्याकरिता प्रार्थना

तारकाची मोफत देणगी आपण घ्यावी ही देवाची इच्छा आहे. येशू तुम्हाला इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा पवित्र आत्माने भरुन वाचवू इच्छितो. जर अद्याप आपण येशूला शांतीच्या अधिपतीला आपला प्रभु म्हणून स्वीकारले नसेल तर, आता आपण ते करु शकता. खालील प्रार्थना करा, प्रामाणिकपणे जर आपण हे कराल तर ख्रिस्तात नवीन जीवनाचा अनुभव आपणास मिळेल.

*हे बापा,*

*देवानें जगावर एवढी प्रीति केली, की त्यानें आपला एकलुता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. तुझे वचन सांगते की आम्ही तुझ्या कृपेने देणगीने विश्वासाने तारले गेलो. तारणा करिता आम्ही काहीच करु शकत नाही.*

*माझ्या मुखाने मी कबूल करतो की येशू ख्रिस्त तुझा प्रिय पुत्र, जगाच्या तारणारा आहे. मी विश्वास ठेवतो की तो माझ्यासाठी वधस्तंभावर मरण पावला, माझे सर्व पापे त्याने आपणावर घेऊन त्याकरीता मोल दिले. मी विश्वास ठेवतो की येशू तू मरणातून पुन्हा उठलास.*

*माझ्या पापांची क्षमा कर असे मी मागतो, येशू प्रभु आहे हे मी कबूल करतो. तुझ्या वचनाप्रमाणे मला तारण मिळाले आहे, व सार्वकालीक जीवन तुजबरोबर जगण्याचे वचन मिळाले आहे!*

बापा मी तुझे मनांपासून उपकार मानतो! येशूच्या नावात, आमेन.

योहान 3:16, इफिस 2:8,9, रोम 10:9,10, 1 करिंथ 15:3,4; 1 योहान 1:9; 4:14-16; 5:1,12,13 पहा.

# संदर्भ

**अध्याय 2**

[1]विश्वासूजनांनाः "...देवाच्या आत्म्याद्वारे चालविले जाते. जसा शिकाऊ उमेदवारांना त्याला शिक्षक चालवतो, व एखाद्या प्रवाशाला त्याचा वाड्याला चालवतो, सैनिकाला त्याचा कप्तान चालवतो. पशूसारखे नाही तर आम्ही विचार करणारे जीव आहोत म्हणून मनुष्ये प्रेमाच्या दोरीने एकमेकांशी बांधलेले असतात... देवाच्या मार्गदर्शनाकरिता विश्वासाने स्वतःला सर्मपित होऊन, आज्ञापालनाद्वारे देवाचे मार्गदर्शन घेतल्यास तो आम्हाला त्याच्या सत्य मार्गाने आमच्या सर्व कर्तव्यात साह्य करतो."

मॅथ्यू हेन्री कॉमेंटरी ऑन द होल बायबल, न्यू मॉडरन इडीशन इलेक्ट्रॉनीक डायबेस, कॉफीराईट 1991 हेन्ड्रीक्सन पॅथ्लीशर आयएनसी, एस.व्ही. "रोम 8:10-16, विश्वासूजनाचे हक्क" त्यांच्या परवानगीने सर्व हक्क स्वाधीन.

[2]अमेरिकन डिक्शनरी ऑफ द इंग्लीश लॅन्गवेज, 10 इ.डी. (सॅन फ्रॅन्सीस्को फॉऊनडेशन फॉर अमेरीकन ख्रिश्चन एज्युकेशन 1998. फॅसीमाईल ऑफ नोहा वेबसरची 1828 आवृत्ती नुसार पुन्हा छपाई करता जी. ॲन्ड चि. मीरीयन कंपनी, सर्वहक्क 1967 व 1995

(रीनीवल) रोझाली जे. स्लॅटर, एस व्ही. “अबाईड” (चिकटूण राहाणे).

**अध्याय 3**

[1]पवित्र शास्त्र आम्हांस शिकवते की येशूच्या रक्ताने आम्हांस संपूर्ण पापाची क्षमा होते (सर्व दोषांपासून संपूर्ण स्वातंत्र्य) आमच्या शरीरातील रक्त प्रवाह जो सातत्याने वाहातो तो सातत्याने आमचे रक्त “शुद्ध” करीत असतो ज्यामुळे आवश्यकता नसलेली घाण “स्वच्छ” करुन विषबाधा होण्याचे संकट टळते. त्याचप्रमाणे जेंव्हा आमची पापे आम्ही कबूल करतो, तेंव्हा त्याचे रक्त (जे त्याने आमच्या पापाकरिता वधस्तंभावर सांडले) सतत आमच्या आतील मनुष्याला धुत असते त्यामुळे आत्मीक विषबाधेपासून आमची सुटका होते. (1 योहान 1:7,9) वाचा.

[2]मत्तय 9:5 टि एलबी आम्हांस सांगतो, मला (येशू).... पापांची क्षमा करण्याचा अधिकार पृथ्वीवर आहे.

**अध्याय 4**

[1]विल्यम स्मीथ, एल्.एल्.जी. स्मीथस् बायबल डीक्शनरी (ओल्ड टॅपन, न्यु जेरसीः स्वायर बुकस्, जोव्ह पब्लीकेशन, आप एनसी, फॉर द फ्लेमीन एच. रेव्हेल कंपनी, 1981). पुष्ठ क्र. 213, एस.व्ही. “गॉड” (देव)

**अध्याय 5**

[1]जेमीसन, काऊंसेट ॲन्ड ब्राऊन कॉमेंटरी, इलेक्ट्रॉनिक डायबेस,

कॉपीराईट 1997 द्वारे बीबलोसॉफ्ट, एस.व्ही. यांना “फीयर” (भीती) सर्व हक्क स्वाधीन.

[2]“उज्जीयाचे काम लहान होते असे वाटते. तो व त्याचा भाऊ अहीओ जे अबीनादबाची मुले होती. व त्यांच्या घरात कोशाची काळजी घेतली जात असे... त्यांनी बैलगाडीत हा कोश वाहाण्यासाठी नेला.... तेव्हा कोश गाडीतून पडण्याची भीती होती म्हणून उज्जीयाने आपला हात लांब करुन कोशाला स्पर्श केला. याठिकाणी विचार करण्यासारखे कारण आहे की कोशाच्या संरक्षणाकरीता तसेच काही अपशकून होऊ नये म्हणून उज्जीयाने हात लांब केला. तरी तो गुन्हा ठरला. उज्जीया लेवी होता, व केवळ याजकच कोशाला हात लावीत असत.

त्यासंबंधी नियम होते जे कोश वाहाणारे (कहाथी) होते ते भक्कम दांड्यांनी कोश वाहत होते. कारण त्याने मरु नये म्हणून कोशाच्या कोणत्याच पवित्र वस्तूला स्पर्श करु नये असा ही नियम होता.

उज्जीयाचा कोशबरोबर दाट परीचय व सहज कोशाची काळजी घेण्याने जे पूर्वग्रह झाले असतील, ते पण त्याला वाचवू शकले नाहीत.”

मॅथ्यू हेन्री कॉम्टेंकरी आन द व्होल बायबल, एस.व्ही. 2 शमुवेल 6:6-11, “उज्जीयाचे कोशाला स्पर्श केल्याने ताडन”

# तारणाची प्रार्थना

देव तुमच्यावर प्रीती करतो आणि त्याला तुमच्यासोबत वैयक्तिक नातेसंबंध हवे आहेत. तुम्ही जर येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारले नसेल, तर आताच तुम्ही त्याचा स्वीकार करू शकता. त्याच्यासाठी तुमचे अंतःकरण उघडा आणि ही प्रार्थना म्हणा...

"पित्या, मी तुझ्याविरुद्ध पाप केले आहे याची मला जाणीव आहे. कृपा करून मला क्षमा करा. मला शुद्ध कर. तुझा पुत्र येशू ह्याच्यावर विश्वास ठेवण्याचे वचन मी देतो. तो माझ्यासाठी मरण पावला - तो वधस्तंभावर मरण पावला तेव्हा त्याने माझे पाप स्वतःवर घेतले असा माझा विश्वास आहे. तो मेलेल्यांतून उठला असा माझा विश्वास आहे. आता ह्या क्षणी मी माझे जीवन येशूला समर्पण करतो.

पित्या, पापक्षमेची आणि सार्वकालिक जीवनाची देणगी तू मला दिलीस म्हणून मी तुझा/तुझी आभारी आहे. तुझ्यासाठी जगण्यासाठी कृपा करून मला मदत कर. येशूच्या नावात, आमेन."

तुम्ही मनापासून ही प्रार्थना केली म्हणून देवाने तुमचा स्वीकार केला आहे, तुम्हांला शुद्ध केले आहे, आणि आध्यात्मिक मरणाच्या बंधनातून तुम्हांला मुक्त केले आहे. पुढील शास्त्रभाग वाचून त्यावर मनन करण्यासाठी वेळ काढा आणि तुमच्या नवीन जीवनात तुम्ही देवाबरोबर वाटचाल करत असताना त्याने तुमच्याशी बोलावे म्हणून त्याला विनंती करा.

- योहान. 3:16
- 1 करिंथ. 15:3-4
- इफिस. 1:4
- इफिस. 2:8-9
- 1 योहान. 1:9
- 1 योहान. 4:14-15
- 1 योहान. 5:1
- 1 योहान. 5:12-13

ख्रिस्तासोबतच्या नातेसंबंधात तुमची वाढ होण्यासाठी तुम्हांला उत्तेजन मिळावे म्हणून पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्या चांगली मंडळी (चर्च) तुम्हांला मिळावी म्हणून प्रार्थना करा. देव नेहमी तुमच्यासोबत असेल. तो रोज तुम्हांला मार्गदर्शन करील आणि तुमच्यासाठी त्याच्याकडे असलेले विपुल जीवन कसे जगावे हे तो तुम्हांला दाखवील!

# लेखिकेविषयी

जॉयस मेयर ह्या पवित्र शास्त्राचे व्यवहारोपयगी शिक्षण देणाऱ्या जगप्रसिद्ध शिक्षिका आहेत. एंजॉइंग एव्हरी डे लाईफ हा त्यांचा टीव्ही आणि रेडिओ कार्यक्रम जगभरातील शेकडो टीव्ही नेटवर्क्सवरून आणि रेडिओ केंद्रांवरून प्रक्षेपित केला जातो.

जॉयस ह्यांनी शंभरपेक्षा अधिक प्रेरणादायक पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या लोकप्रिय आणि प्रचंड मागणी असलेल्या पुस्तकांमध्ये *गॉड इज नॉट मॅड अट यू; मेकिंग गुड हॅबिट्स, ब्रेकिंग बॅड हॅबिट्स; डु युअरसेल्फ अ फेवर... फरगिव्ह; लिव्हिंग बियॉन्ड युअर फिलींग्ज; पॉवर थॉट्स; बॅटलफील्ड ऑफ द माइंड; लूक ग्रेट, फील ग्रेट; द कॉन्फिडन्ट वुमन; आय डेअर यु; अ‍ॅन्ड नेव्हर गिव्ह अप!* ह्या पुस्तकांचा समावेश आहे.

*जॉयस* वर्षभर विपुल प्रवास करून जगभरातील अधिवेशनांमध्ये हजारो लोकांसमोर संदेश देत असतो.

To contact the author in the United States, please write:
Joyce Meyer Ministries
P.O. Box 655,
Fenton, Missouri 63026
or call: (636) 349-0303
or log on to: www.joycemeyer.org

**Go to tv.joycemeyer.org**
**to watch Joyce's messages in a variety of languages**

To contact the author in India, please write:
Joyce Meyer Ministries
Plot No. 512/B, Road No. 30,
Jubilee Hills, Hyderabad - 500 033
or call: 2300 6777
or log on to: www.jmmindia.org